REGISTERD NO 7,1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० ९ माहे आगष्ट सन १८७४ इ० अंक ३२

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ८४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| " दुसरे खेपेस | ८२ |

## नोटिस.

नोटिस— मगनीराम तनसुकदास साहू दुकान तेल्हारें तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येतें कीं, तुह्मी दिलेल्या नोटिशी प्रमाणें आह्मास देणें नाहीं. तुमचे वडिलाचे हातचें जें देणे होतें त्याचा निकाल पूर्वींच झाला आहे विनाकारण नोटिशींत मजकूर वाढवून लिहिता तो बरोबर नाहीं सबब या नोटिशीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल कळावें तारीख २ माहे आगष्ट सन १८७४ इसवी.

(सही) लिंबकराव देशमुख, हिवरखेड
दस्तुर गोविंद बगलाजी
कुलमुकत्यार

नोटिस — सैद अहमद साहेब वल्लद सैद हसन साहेब जहागिरदार चितोडे वगैरे वस्ती बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तुमचेकडे आमचे दुकानची खातेबाकी अजमासे रुपये ५००० अक्षरी पाच हजार निघत आहे. त्यास तुह्मी सहा महिन्यांपासून रुपयांचा निकाल करितो ह्मणून पुष्कळ करार केले परंतु अद्यापपर्यंत रकम पटविली नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यात येते कीं, ही नोटिस पावल्यादिवसांपासून १५ दिवसांचे आंत सदर्हू रुपयाचा व्याजासुद्धां व या नोटिशीचे खर्चासुध्धा निकाल करावा. जर मुदती प्रमाणें निकाल न केल्यास शिरस्त्याप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारिख ३० माहे जुलै सन १८७४ इसवी.

(सही) हरदयाळ गोविंदराम
दुकान बाळापुर.

नोटिस — खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, प्रतिवादी भंग्या व बिद्या वल्लद बुधा महार रहाणार मौजे चोरड खुर्द तालुके अकोट जिल्हे अकोले याजला — तुह्मी मजला २०० दोनशे रुपयांचे गहाणखत तारिख १८ माहे सेप्टेंबर सन १८६८ इसवीचें लिहून दिले त्या रकमेचा करार पुरा झाला परंतु अद्याप पर्यंत रुपये देत नाहीं. या महिन्यांत व त्या महिन्यांत देतो ह्मणोन चाळविता ह्मणून या नोटिशीनें कळविण्यांत आलें आहे कीं, सदर्हु रकम नोटिस पावल्यापासून आठ किंवा पंधरा दिवसांचे आंत तडजोड करून रोख द्यावी नाहीं तर फिर्यादी करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील कळावें तारिख २५ जुलै सन १८७४ इसवी.

(सही) निरंजनशिंग वल्लद गुलाब
शिंग रहाणार उम्बर तालु
के अकोट दस्तुर खुद.

नोटिस — गणेश वासुदेव कोडें ऊर्फ चिमणराव रहाणार भिंवडी हल्लीं वस्ती जळगाव तालुके मजकूर जिल्हा अंकोले यास नोटिस देणार गोविंद हरि फडके मुक्काम जळगाव जामोद याजकडून देण्यांत येते कीं आह्मी तुह्मास राजिस्टर करून नोटिस दिली परंतु जुमानली नाहीं तर ह्या नोटिशीनें आगाऊ कळवितो कीं तुह्माकडे येणे रुपये १०३ त्यांत तुह्मी नाटकाचे सामान माझे हवाली केलें त्यांचो पंच अनुमते किंमत रुपये ५० पर्यंत आहे तर दर महाचे रुपये १८ व ३२ रोख पैकीं धरून बाकी राहिलेली रकम रुपये ५३ नोटिस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत देऊन पावती ध्यावी, पुढे रुपये राहिल्यास दरमहा दरशेकडा २ रुपये प्रमाणे व्याज द्यावे लागेल ह्मणोन नोटिस दिली आहे. तर ह्या नोटिशोचे कराराप्रमाणे आपलेकडून न होईल तर रीतीप्रमाणे तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून व्याज व खर्चासुद्धा सर्व रकम घेण्याची तजवीज होईल कळावें तारीख ३० माहे जुलै सन १८७४ इसवी.

(सही) गोविंद हरि फडके मुक्काम
जळगाव जामोद दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## अंबादास.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि० वि० खालील मजकूर कृपा करून प्रसिध्ध करावा.

मित्रहो, ज्याप्रमाणें नांव त्याचप्रमाणें वर्तणूक असणें हें तरी पूर्व पुंण्याईवाचून नाहीं. पहा मी मोठा भाग्यशाली आहे. माझ्या मातापितरांस माझ्या जन्माच्या १२व्या दिवशीं माझें "अंबादास" हें नांव भूत भविष्य जाणणाऱ्या जगदात्म्यानेंच ठेवण्याची तर बुद्धि दिली नसेलना? मित्रहो, तुह्मी माझ्या नांवाचा अर्थ समजलेत ना? देवीभक्त मला ह्मणूनका. तर मी लग्न झालेल्या ८।९वर्षांच्या मुलीचा मोठा भक्त आहे आठ नऊ वर्षांच्याच काय परंतु २०।२२ वर्षांच्याही लग्न झालेल्या माझ्या येथें स्त्रिया आहेत. मी मोठा लुच्या आहे हें मी आपल्या तोंडानें तुह्मास सांगतो.

स्त्रीजातीची [ आपल्या स्वतःच्या मुलीची ]आशा करणें व्यर्थ आहे. परक्याचें धन आपल्याजवळ ठेऊन काय उपयोग? हें जरी मला पूर्णपणें समजतें तरी पण माझ्या घरीं असलेल्या मुलींचा मला लोभ ज्यास्तच सुटतो. ज्यांस माझी ही कृति माहीत नाहीं ते मला कुटुंबवत्सल ह्मणतात, व तें खरेंही आहे कारण मी, माझे भाऊ, माझ्या बाहिणी, त्यांचां मुलें, व मुलीं हीं सर्व माणसें एकत्र असल्यामुळें मला कुटुंबवत्सल असें ह्मणतात. मी ज्या गांवीं रहातो त्या गांवच्या आसपास ५० ६० कोशांत लोकांमध्यें माझी बरीच चहा आहे. परंतु सोयऱ्यांत मला छीः थू करितात. कारण कीं ब्राह्मण ज्ञाती प्रमाणें मी माझ्या मुलींचीं वगैरे लग्नें करून देतो मात्र. परंतु त्यांस सासरचा वाराही लागूं देतनाहीं. मजमध्यें एक मोठा गुण आहे तो असा कीं, ठाणें हिंदुपंच कर्त्यांनीं कन्याविक्रय करण्याबद्दल रत्नागिरी जिल्ह्याची उत्तर सीमा बाणकोट व दक्षिणेस वैतखोल पूर्वेस घांट आणि पश्चिमेस समुद्र यामधील सुमारें शंभर कोशांच्या वस्तींत तर पोरी विकण्यानें आपलें घर केलें आहे ह्मणून आर्टिकल दिलें आहे. त्याप्रमाणें मी करीत नाहीं. मजशी संबंध करणाऱ्या सोयऱ्या धायऱ्यांस "मी लुच्या आहे" ह्मणून मी पूर्वींच सांगतो. व कांहीं वेळानें सात्विकपणास आणि माझ्या कुटुंबास भुलून मजशी ते नातें जोडितात!!! "क्वचित् काणा भवेत् साधु" याप्रमाणें जरी मी आहे तरी पण मजशी लोक स्नेह जोडतातच हें मोठेंच आश्चर्य मानावयाचें!!!

मित्रहो, काय करावें अशा माझ्या करण्यानें सोयऱ्याधायऱ्यांत माझी फजिती व बेइज्जत झाली पण असेंच कांहीं दिवस चालल्यास ५०।६० कोशांत असलेली माझी चहा आहे तीही जाईल. तर या लेखावरून मी थोडीसी लाज व दया धरून माझ्याशीं आणखो संबंध करणाऱ्या लोकांस मी विनयपूर्वक सुचवितो कीं, यापुढें माझ्याशीं तुह्मी संबंध ठेवालतर फसाल, यांत माझा कांहींच दोष नाहीं कारण माझ्या नावाप्रमाणें मी वर्तत असतो. मी उलटा आणि सुलटा सारखाच आहे. [ आंबादास ]तर या सूचनेकडे मजशीं संबंध करणाऱ्यांनीं लक्ष द्यावें. असो. आतां या खेपेस इतकीच सूचना बस आहे.

मिती ज्येष्ठ कृष्ण ६ रोज शुक्रवार

आपला
अंबादास

वाशीम तारीख १९ जुलै सन १८७४ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० अलीकडे स्वदेशीय माल आपले हिंदुस्थानांत बराच निघू लागल्याचें चोहोंकडून वर्तमान येतें व हें ऐकून फार आनंद होतो. परंतु जर त्या मालाचा खप पुष्कळसा होतो असें ऐकिवांत आलें तर ( हल्लीं तो कोठें ऐकिवांत नाहीं ह्मणून ) त्याहून ही ज्यास्ती आनंद होण्याचा आहे. परंतु तसें होत नाहीं असें दिसतें. आज काय कोणी स्वदेशीय मेणबत्ती काढिली, आज काय छत्री काढिली, आज काय आगपेटी काढिली, अशा अनेक चिजा निघू लागल्या आहेत. परंतु त्या गावी गाव पाठऊन त्याचा खप चांगला झाल्याचें शुभ वर्तमान ऐकू येत नाहीं. जेथें जो जिन्नस निघतो तेथेंच अगर त्याजपासून १०।२० कोसांचे आंतच तो कसा आहे वगैरे लोकांस समजतो. दूर दूरच्या लोकांस नुस्ता पहाण्यासही मिळत नाहीं, मग उपयोग करण्यास मिळणें दुरापास्तच. आज मी कित्येक दिवसांपासून स्वदेशीय आगपेटा पहाण्यास इच्छितो परंतु ती अद्याप माझे पहाण्यांत आली नाहीं. मला आणखी माझे कित्येक मित्रांनां स्वदेशीय माल विलायती मालाचे ऐवजी उपयोगांत आणावासा वाटतो. परंतु निरुपाय होऊन स्वस्थ बसतो. स्वदेशीय मालाचा खप होण्यास मला एक युक्ती सुचली आहे ती अशी :— वर्तमानपत्रें निघतात तीं गावें बहुत करून मोठींच असतात, अशा मोठ्या ठिकाणीं माल पाठवित गेले तर माल लोकांस मिळून त्याचा खपही होत जाईल. माल पाठविणें तो वर्तमानपत्र कर्त्याकडेस पाठवित जावा ह्मणजे ते हर तऱ्हेनें मालाची विक्री होण्याची योजना करतील. वर्तमानपत्र कर्त्यांनीं ज्या अर्थीं आपला देश सुधारण्याचा विडा उचलला आहे त्या अर्थीं हें काम करण्यास ते कधींच मागें सरणार नाहींत इतकेंच नाहीं परंतु नेहमी आपआपल्या वर्तमानपत्रांतून नोटिसा वगैरे देऊन लोकांस कळवित जातील व तेणें करून लोकांस तो माल घेण्यास बरें पडेल. असा कांहीं दिवस क्रम राहिला ह्मणजे अर्थातच इतर व्यापाऱ्याला वाटून तेही तो माल आणीत जातील. एकदा त्यांनां गोडी लाऊन देण्या करितांच हा धंदा वर्तमानपत्र कर्त्यांनीं करावा. आणि असें करतील तर खचीत आपले देशाचें हित होईल. कोणताही नवा पदार्थ मनुष्याच्या दृष्टीस पडला ह्मणजे त्यास घ्यावासा वाटतोच. त्याच प्रमाणें आपल्या स्वदेशीय मालाची स्थिति होणार आहे. स्वदेशीय माल विलायती मालपेक्षां जितका कमी दरानें विकवेल तितका, निदान बरोबर तरी दरानें विकण्याचा क्रम ठेवावा. कांहीं दिवस अशा रितीनें माल विकण्यास फार कठीण पडेल ह्मणजे नफा मिळावा तसा मिळावयाचा नाहीं. परंतु सध्या अशाच दरानें विकून पुष्कळ सामान विकल्याचें समजल्यावर त्याजवर थोडथोडा दर चढवितां येईल. या मालाचा खप होण्या करितां जितका प्रयत्न होईल तितका करण्यास कोणी मागें पुढें पाहू नये. मग य

त थोडासा द्रव्यखर्च व अंगमेहनत ला
गली तरी कांहीं चिंता नाहीं. या सूचने
कडे आमचे देशहितेच्छु लोकांनीं जरा ल
क्ष द्यावे अशी आमची त्यांस विनयपूर्वक
प्रार्थना आहे. पत्र विस्तारास्तव माफी मा
गून पुरें करितो कळावे हे विनंती.

आपला मित्र
"लोकहितेच्छु"

---

वाशिम तारीख २३ जुलई सन १८७४
रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि० विशेष येथील तहशिलदार
मि० सादत मीरखान यांची बदली पुसदा
स होऊन त्यांचे जागेवर मि० अबदुल रहिमा
नखान पुसदचे तहशिलदार येथे येणार अ
शी ववंता आहे. त्यांचे जाण्याने येथील
बहुतेक लोकांस दुःख झाल्यावाचून राह
णार नाहीं. येणारे पुसद तहशिलदार
यार्णीं मि० सादत मीरखान यांचे सारखे
लोकप्रिय राहवे अशी आह्मी त्यांस शिफा
रस करतो.

मे० अबदुल हक साहेब येथील एक
स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची ज्या जागेंत
आजपावेतो लायब्ररी होती ती जागा डे०
ए० इन्स्पेक्टर साहेब यांचे आफिसाकरि
तां दिली असें समजतें. आतां आमचे मि
त्र अबदुल हक साहेब यांची लायब्ररी को
ठें आहे कांहीं समजत नाहीं. हल्ली ती
आस्थित्वातही आहे कीं नाहीं याचा संशय
आहे.

मे० डे० कमिशनर साहेब यांनीं लक्ष
पुरविल्या वरून हल्लीं शहर सफाईचें काम
बरेंच चाललें आहे. गावांतून बहुतेक ग
टारी खणल्या आहेत. या गटारींतील मा
ती जवळच सडकेवर पसरून देतात या
मुळें थोडा पाऊस पडला तर फार चिख
ल होतो व फार पाऊस असला तर तीच
माती पुन्हा पाण्या बरोबर गटारींत जा
ऊन त्या मातीनें भरतात याजकरितां त्या
मातीवर मुरूम टाकिला असतां चिखल न
होतां गटारीही चांगल्या रहातील. इकडे
आमचे म्युनिसिपाल कमिटीचे सेक्रेटरी ल
क्ष देतील काय?

लिहिण्यास दुःख व आश्चर्य वाटतें कीं
एथील बालाजीचे देवळांतील लक्ष्मीचे अं
गा वरील एक पुतळ्याची माळ व नथ गे
ली. देवावरही दरोडा घालण्याला चोरानें
कमी केलें नाहीं. शाबास त्याची!! देवाचे
अंगावर तरी अलिकडे फारसे डागिणे घा
लित नाहींत. देवाचे अगदी जवळ लोक
दर्शनास जातात ती चाल बंद करणें ज
रूर आहे. नाहीं तर असें प्रसंग पुनः ये
ण्याचा संभव आहे.

मे० डे० कमिशनर साहेब यांचे कचे
रीकडे जाणारी सडक कांहीं थोडीसी नी
ट केली आहे. परंतु ती फारच थोडी
आहे. आमचे दयाळु मे० डे० कमिशनर
साहेब ती सर्व दुरुस्त करण्याचे मनावर घे
तील तर लोकांवर त्यांचे महत् उपकार
होतील. याजकडे जरूर लक्ष पुरावण्या वि
षयीं आमची त्यांस वियनपूर्वक प्रार्थना
आहे.

अलीकडे पावसानें तर बहारच उढऊ
न दिली आहे. दिवसभर लखलखीत ऊ
न पडून रात्रीचा पाऊस पडू लागतो. या
जमुळें फारसा कोणास त्रास होत नाहीं.
पिकें चांगल्या स्थितींत आहेत.

आपला मित्र
"लोकहितेच्छु"

---

# वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १२ शके १७९६

## निजाम सरकारची स्वारी.

हैद्राबादेस तारीख २४ माहे जुलै सन
१८७४ रोज शुक्रवार हा मोठा उत्साहा
चा व आनंदाचा असा दिवस झाला. त्या
दिवसाचा थाट समग्र वर्णन करणें अश
क्य होय. जिकडे तिकडे चकचकाट, लख
लखाट आणि सर्वत्र सुप्रसन्नता व ध
न्यता दुमदुमत होती. दैन्यास व दुःखास
त्या दिवशीं तेथें थाराच नव्हता ह्मणून तें
दिगंतरीं गेलें होतें. असा थाट व उत्सा
ह कशाकरितां ह्मणाल तर थोडी हकीक
त सांगतो.

तेथील निजाम साहेब लहान आहेत
हें आमचे वाचकांस ठाऊक आहेच त्यांचे
वयास आठ वर्षें पुरी झालीं व आतां त्यांचे
ज्ञातिधर्माप्रमाणें ते कायद्यांत आले या
साठीं राजवाड्याच्या बाहेर निघण्याचा व
सर्व रयतेच्या दृष्टीस पडण्याचा ते विधी
करीत असतात तो हर्षोत्साहसूचक विधी
२४ वे तारखेस शुक्रवारीं झाला.

पूर्वींच ताकीद देऊन ठेविली होती
कीं शुक्रवारीं पहाटेच्या रात्रीं शहरांतील
व स्वारी जाण्याच्या बाजूचे सर्व रस्ते झाडू
न साफ करावे. व त्यांवर पाणी शिंपडावें,
पण पाणी शिंपण्याचें काम पूर्व रात्रीं मेघ
राजानें आस्था पूर्वक केलें व संतोषाची
गोष्ट ही कीं स्वारीच्या थाटाच्या दिवशीं
मेघराज अगदी अदृश्य राहिले तेणेंकरून
सर्व सुखसोहळा यथासांग झाला.

सकाळीं ७ वाजतां निजाम सरकारची
स्वारी वाड्या बाहेर निघाली त्याबरोबर
दोन वेळा एकवीस एकवीस तोफांची सर
बत झाली. सरकारानी पिवळा पोशाक के
ला होता व हत्तीवर अंबारींत बसले होते
त्या अंबारीलाही पिवळें जरतार लाविलें हो
तें. सरकार साहेब पुढल्या अंगास बसून
प्रतिनिधी अमिरी काबीर शमसुल उमराव
बहादर आणि मुखत्यार उल मुलुख सर सा
लरजंग बहादूर जी. सी. एस. आय हे स
रकारच्या पाठीमागें बसले होते. अघाडीला
हत्तीवर जरी पटक्याचीं तीन निशाणें हो
तीं. एका हत्तीवर कुराणाचें पुस्तक होतें.
एका हत्तीवर सरकारचे मामा विकर उल
उमराव हे आपल्या दोन चिरंजिवा सहि
त होते. आणखी कांहीं अमीर उमराव ह
त्तीवर व बाकी थोर लोक शेकडोशहा घो
ड्यावर होते. स्वारीच्या समारंभांत लोकांची
दाटी होऊं नये ह्मणून पोलिसाच्या टो
ळ्या उभ्या केल्या होत्या. व दुतर्फा लाय
नीनें लाविलेल्या व पुढच्या मिरवणुकीच्या
फौजा इतक्या होत्या कीं त्यांचे चित्र जरी
काढिलें तरी तें फार मनोरम दिसेल. अ
शी गणना केली आहे कीं त्या प्रसंगीं
२०००० हत्यारबंद लोक स्वारींत सज्ज
होते. त्यावरून इतर तमासगीर किती अ
सतील त्यांची कल्पना वाचकानीं करावी.
पठाण, अरब, रोहिले यांच्या सुशोभित
फौजा, तशाच घोडे स्वारांच्या वगैरे फौजा
अघाडीस होत्या. सरकार स्वारीचे खासे
घोडे उत्तम वस्त्रांनीं व मोलवान दागिन्यां
नीं शृंगारून कोतवालीला मिरवत होते अ
शा अनेक परीच्या थाटानें सरकार स्वारी
सर्व लोकांचे मुजरे घेत घेत व फकीर व
गैरे लोकांना आपले हातानें द्रव्य वाटीत
वाटीत रस्त्यानें चालली होती. सरकारचें
वय आठ वर्षांचे, बांधा चांगला, रूप सुं
दर, व चेहरा पाणीदार अशी ती कोवळी,
सकुमार, व मदनमनोहर मूर्ती पहातां पहातां
सर्व लोकांचे डोळे साल्हाद भरानें अतृप्त
च रहात ह्मणून ते पुनः पुनः पुढें पुढें
जाऊन डोळे भरून पहात असत. हत्ती व
रून फकिरांस द्रव्य वाटीत असतां सरका
रचे हात दमून आले तेव्हां सर सालरजंग
साहेब यांनीं त्या थैल्या आपले हातानें वा
टिल्या. या प्रमाणें झबा बागेवर स्वारी आ
ली. नंतर सरकार बगीच्यांत गेले व बाकी
चे लोकांस उतरण्या करितां डेरे, राहु
ट्या, तंबु, कनाथा दिल्या होत्या तेथें ते
उतरले व फौजांचेही सभोवार तळ पडले.
बागेमध्यें मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें
कांहीं विधी झाला व त्याकडे २ हेले व ३
बकरीं खर्च झालीं. नंतर अस्तमानाचे
समयास स्वारी परत यावयास निघाली ती
गेलेल्या थाटा प्रमाणेंच परत आली.

पुढें पहिले तारखेस रेसिडेंट साहेबाचे
ही मुलाखतीस निजाम सरकारची स्वारी
गेली होती तेव्हांचाही थाट चांगला झा
ला. ११ वाजतां रेसिडेन्सींत जाऊन ५
वाजत पर्यंत विश्रांती घेऊन स्वारी माघा
री आली.

---

## वऱ्हाड.

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वा
री मागें उमरावतीचे सेशनास गेली हो
ती व तशीच पुढें इलिचपुरास सेशनाक
रितां जाणार होती, परंतु तिकडे परज
न्य त्यावेळेस आतिशय असल्यामुळें उ
मरावतीहूनच परत आली. तें राहिलेले
सेशन उर्दईक इलिचपुरास नेमलें आहे
व त्याकरितां साहेब आज पाहाटे नि
घून गेले. आणखी असें वर्तमान आहे
कीं १७ वे तारखेस यवतमाळ जिल्ह्यांचे
सेशन आहे ह्मणून कदाचित तिक
डच्याच भागास दोन आठवडे कामें
पाहून नंतर जु० क० साहेब परत येती
ल. त्यांबरोबर काम चालविण्याकरितां
रा० रा० भास्कर सखाराम क्ला० आ०
कोर्ट हे कालच पुढें गेले आहेत.

—०००—

रा० रा० कृष्णाजी हरी कोलटकर
यांची जु० क० आफिसांत डिपुटी क्लार्क
चे जाग्यावर नेमणूक झाल्या प्रमाणें ते
येऊन आपले कामावर रुजू झाले. व रा
गणेश बापुजी यांस त्यांचे ६० रुपयांचे
जागेवर बुलढाण्यास नेमिले. गणेशपंत हे
रा० रा० बापुजी रंगनाथ ए० अ० क०
यांचे चिरंजीव असून म्याट्रिक्युलेशनच्या
परिक्षेंत पास झालेले आहेत.

—०००—

मि० इलियट साहेब बुलढाण्या कडी
ल आसिस्टंट कमिशनर यांची अकोल्या
स नेमणूक होऊन मि० दस्तूर बहिमन
जी साहेब यांस बुलढाण्यास कायम
केलें.

—०००—

वाशीमचे एकस्ट्रा असि० क० मि०
अबदूल हक्क साहेब यांच्या कोर्टांतील
वकील रा० रामराव आपाजी यांनीं त्यां
स एक मुकद्दम्याचें काम चालवित अस
तां "तुह्मी दुराग्रह धरिता" असें ह्मट
लें त्या वरून त्यांनीं वकील मजकुरावर
फौजदारी मुकद्दमा करून त्यास २०० रु
पये दंड केला. त्यावर वकिलानें तेथील
डिपुटी कमिशनर क्या० फिटझरलड
साहेब यांकडे अपील केलें. त्यांनीं मुक
द्दम्याचें स्वरूप पाहून त्या पैकी २० रु
पये दंड कायम ठेविला व १८० रुपये
परत देवविला. तथापि त्यांस वकिला
विषयीं काय वाटलें कोणास कळे, त्या
नीं त्यास सहा महिने सस्पिंड करण्याचा
ठराव करून मंजुराती करितां जु० क०
साहेब यांजकडे लिहिलें परंतु त्यांनीं तें
मंजूर केलें नाहीं व वकिलास कामावर
जाण्या विषयीं सांगितलें. या विषयीं अ
धिक विच्यार आह्मी पुढें लिहू.

—०००—

पोलिस इन्स्पेक्टर मि० करिमखान व
चिफकान्स्टेबल मि० शिवरामसिंग यांजव
रील फौजदारी मुकदमा १०।१२ दिवस
बुलढाण्यास क्या० हडलस्टन साहेब यांपु
ढें चालला. व प्रासिक्युशन' तर्फेचें काम
पुरें झालें. १५वे तारखेपर्यंत मुकदमा त
कुब राहिलाआहे. सरकारतर्फें साक्षिदारां
तून एक साक्षिदार फितविण्याचा आरोपि
तानीं प्रयत्न केल्याचें कळून आल्यावरून
ते जामीनावर खुले होते त्यांस जेलांत दा
खल केलें व खोटी साक्ष देणारावर स्वतं
त्र मुकदमा होऊन त्यास एक वर्ष कैदेची
सजा झाली.

—०००—

रा० रा० सदाशिव नारायण मुंबईक
डून आलेले नवीन वकील यानीं वऱ्हाडां
त कोठेंही वकीली करण्यास हरकत नाहीं
व त्यांस रेसिडेंट साहेबांचे परवानगीनें दा
खला देण्यांत आला आहे अशा मजकुराचें
जु० कमिशनर साहेबानीं नुकतेंच सरक्यु
लर केलें आहे.

—०००—

मि० डनलप साहेब असिस्टंट कमिश
नर यांजकडे मूर्तीजापुर तालुक्याचें काम
दिलें. व त्यांस रेलवेमाजिस्त्रेट नेमल्याविष
यीं रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिध्ध झालें
आहे.

—०००—

खामगावचे आनररी माजिस्त्रेट रा० जा
नराव देशमुख मरण पावले असें समजतें.

—०००—

उमरावतीस सत्यप्रकश नावाचें मागें प
त्र निघत असे त्याचे एडिटर रा० रा०
वामन गोविंद रानडे हे मुंबई इलाख्यांती
ल वकीलीच्या परिक्षेंत या वर्षीं पास झालेले

आहेत. व त्यांनीं पुणे जिल्ह्यांत वकीली करण्याविषयीं परवानगी मागितल्यावरून तिकडील हायकोर्टानें ती त्यांस दिल्याचें टाइम्स आफ इंडियावरून समजतें. असें ऐकण्यांत आहे कीं रानडे यांनीं वऱ्हाडांत वकीली करण्याविषयीं रेसिडेंट साहेबांची परवानगी विच्यारिली होती पण त्यास मिळाली नाहीं.

—०००—

मुंबईचे नामांकित वकील रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांस सरकारानें कायदे कौसलांत मेंबर नेमिलें. तसेच एक वकील रा. रा. गणपतराव भास्करजी यांस स्मालकाज कोर्टाचे जडज नेमिले हें ऐकून आह्मास संतोष होतो. आमच्या इकडे चांगल्या वकिलाची योग्यता उत्साह दृष्टीनें सरकार पाहते किंवा त्यांची बूज राखिते असें दिसत नाहीं. रा. रा. देवराव विनायक, पांडुरंग गोविंद, व अबाजी खंडेराव हे चांगले हुशार वकील आहेत व बाहेरही असे कोणी असतील तेव्हां यांपेकी कोणास सरकार ए० असिस्टंट, निदान तहशिलदार तरी करतील तर त्यांस व सरकारासही भूषण होईल.

———

येथील हायस्कूलच्या संबंधानें बराकींत बोर्डिंग [ भोजनगृह ]होण्याची तजवीज चालू आहे लवकरच अमलांत येईल.

———

रा० रा० नागोराव जयकृष्ण असिस्टंट काटन कमिशनर यांस प्रो० कायद्याचे २०वे कलमाप्रमाणें फर्स्टक्लास माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

—०००—

वाशीमचे तहशिलदार मि० सादत मीरखान यांस पुसदेस नेमून तेथील मि० अबदुल रहिमानखान यांस वाशिमास नेमिलें.

—०००—

रा० अपाजी बळवंत येथील दुसरे नंबरचे असिस्टंट कोर्टाचे शिरस्तेदार यांस कांहीं कागदपत्राच्या गलतीच्या संबंधानें सस्पिंड केलें आहे. हिवरखेडच्या पाटिलकी प्रकरणांतील कागद डिपुटीकमिशनर आफिसाकडून असिस्टंट कमिशनर आफिसामार्फत अकोटचे तहशिलदाराकडे जाण्याचे असून गेले नाहींत असें समजतें. सन १८७२ सालीं हे कागपत्र अकोटचे त्यावेळचे तहशिलदार रा० रा० एकनाथ मोरेश्वर यांजकडे रवाना झाले असें ठरवून त्यांनीं त्यांचा पत्ता लावून द्यावा असें त्यांस सक्तीनें लिहून १५ दिवस त्यांचा पगारही तकूब केला होता पण त्यांकडे कागद पोचल्याचें शाबीद झालें नाहीं ह्मणून त्यांचा पगार पुन्हा त्यांस चालू केला व तें प्रकर्ण दप्तरीं राहिले होते तें हल्लीं पुन्हा सुरू झालें आहे व त्याची मजल असिस्टंट कोर्टाच्या शिरस्तेदाराच्या सस्पिंडीपर्यंत आली आहे पुढें काय निकाल होतो पाहावें.

--०००—

अकोल्यांत चांगला जाणता वैद्य कोणी नाहीं. व असे आषाढ श्रावण वगैरे महिन्यांत आजाराची साधारणतः वृद्धी असती ह्मणून अशा प्रसंगीं तर सुज्ञ वैद्याची अत्यावश्यकता आहे हें आमचे वाचकांस ठाऊकच आहे; ह्मणून त्यांस कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो कीं खानदेशांतील अमळनेराहून वे. शा. सं. रा. गणेश शास्त्री वैद्य येथें आले आहेत व त्यांचा कांहीं काल येथें रहाण्याचा मानस आहे असें ऐकण्यांत आलें आहे. शास्त्रीबावामध्यें दुसरेही कियेक चांगले गुण आहेत असें ह्मणतात तेही सहवासाचे योगानें प्रत्ययास येतील. यांचें वास्तव्य छापखान्या नजिक रा. रा. गंगाधर वासुदेव अकोलकर डायरेक्टर साहेबाकडील क्लार्क यांच्या येथें आहे.

———

एक आठवड्या पूर्वीं पाऊस फार चांगला पडत होता व लोक कंटाळण्याचे बेतास आले होते तो या आठवड्यांत तो बंद झाला. आतां चांगली उघाडी पडली आहे. व शेतीचीं कामें झपाट्यानें चालू आहेत. पुणें प्रांताकडेही परजन्य अतिशय झाला. या मुळें या वर्षीं फार स्वस्ताई होईल असें दिसते.

———

मलकापुरचे मास्तर रा० रा० बळवंत नृसिव्ह यांचें कुटुंब नगर जिल्ह्यांत राहुरी येथें माहेरी गेलेलें परत येत असतां एका मुकामावर बरोबर असलेल्या मनुष्या पैकींच एक विधवा स्त्री चोरास मिलाफी होऊन तिनें दागिन्याचा थैला मालकिणीचे उशाला होता तो झोपेंत हळूच काढून घेऊन बिनबोभाट लांबविला. याचा अजून पत्ता लागला नाहीं. कांहीं चोर सापडले पण त्यांजपाशीं माल नाहीं व ज्यांजपाशीं माल असण्याचा संभव आहे ते मोगलाईंत पळाले आहेत. या प्रमाणें बळवंतराव यांची सात आठ शें रुपयांची नुकसाना झाली. कुटुंब माहेरीं परत गेलें व आतां त्यांचे वडील तिकडे गेले आहेत. तपास चालू आहे. हा अधिक खर्च ही चोरास दक्षिणा होय !

———

म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेत पास झालेल्या एका गृहस्थानें अकोट तालुक्यांत अकोलखेड या गावीं लोअर क्लास स्कुलांत १० रुपयांची असिस्टंट मास्तरची नोकरी पतकरली आहे. विद्येचें मोल गरजेच्या संबंधानें किती उतरत चाललें तें पहा !

———

इंदुप्रकाशच्या उमरावतीच्या बातमीदारानें लिहिलें आहे कीं प्रमोदसिंधूचे एडिटर रा० रा० यशवंत गोविंद सातारकर हे आगकाड्या तयार करण्याचे कामीं यत्न करीत आहेत. काड्या लवकरच बाहेर पडतील. यशवंतराव हे हरएक देशसुधारणेचे कामीं फार झटत असतात. त्यांस या काड्यांचे प्रयत्नांत यश येवो असें आह्मी इच्छितो. तेणेंकरून देशाचा व त्यांचे स्वतांचाही विशेष फायदा होईल.

———

खामगावचे वकील रा० बाळाजी नारायण यांजकडे चोरी झाली होती ती व त्याच दिवसांनी पोलिसानें बुलढाणें जिल्ह्यांत देउळगावराजाकडे पकडली असें समजण्यांत आलें आहे..

———

वणी व यवतमाळ याच्या दरम्यानच्या रस्त्यावर घोटी ह्मणून नाला आहे त्यांतून रा० वामन दामोदर राशिनकर इंजनेर खात्याकडील ओव्हरसियर उतरून येत असतां वाहवले व बुडून मरण पावले. वऱ्हाडांत असे प्रसंग हमेशा येतात तर सरकारानें रयतेच्या जिवाची काळजी बाळगून नद्या नाल्यानां पूल व चांगले रस्ते अवश्य करावे. प्र. सिं.

इलिचपुरचे असिस्टंट कमिशनर क्या० फ्यारर साहेब यांनीं विलायतेस जाण्या करितां दोन वर्षांची रजा घेतली. प्र. सिं.

———

जमीदार लोकांकडून मयता बदल च्यार आणे व कारकुना बदल च्यार आणे सरकार कापून घेत होते ते त्यांचे अर्जविरून त्यांस परत मिळण्याचा व या पुढें न कापण्याचा ठराव झाला. प्र. सिं.

———

वाशिम ( मित्राकडून ) तारिख १ आगष्ट —

हल्लीं अकाश नेहमी ढगांनीं व्याप्त असतें. या पंधरवाड्यांत पर्जन्य इतका पडला कीं तणेंकरून बहुत लोकांचीं घरें पडलीं. गावांत कमिटीचें लक्ष कमी असल्यामुळें दुर्गंधी फार चालते. व तिच्या योगानें ह्मणा अथवा दुसऱ्या कारणा वरून ह्मणा गावांत पोट दुखणें वगैरे प्रकारचे रोग बरेच उत्पन्न झाले आहेत. सफाई करविण्याकडे सेक्रेटरी फुरसत. सापडल्यास लक्ष पुरवितील तर बरें होईल.

डे० ए० इनस्पेक्टर हे इंग्लिश मराठी शाळेची परीक्षा घेण्याकरितां तीन दिवस जात आहेत.

येत्यां रविवारीं रीडग रूम व जनरल लायब्ररी हीं एक होणार असें ऐकतो. रीडिंग रूमचे सेक्रेटरी व जनरल लायब्ररीचे मेंबर्स यांणीं येत्या रविवारीं सभा भरावेण्याचा निश्चय केला आहे.

येथील नायब तहशीलदार याणी दीड महिन्याची रजा घेतली आहे.

## मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस — नारायण वल्लद भिवाजी पवार रहाणार सारगाव चाहू तालुके मलकापूर यांस जमनादास बनेचंद साहू दुकान सारगाव नेहू तर्फे वहिवाटदार गणेश विठ्ठल याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं मौजे सारगाव चाहू येथील आमचे आखरचें शेत सरव्हे नंबर ५८ चे १६ एकर १७ गुंठे आकार रुपये १८ चे तुह्मी २०० रुपयास खरेदी घेण्याचा ठराव केलात व विसारा करितां आपले हातांतील चांदीची छापीची मुदी किंमत सुमार २ रुपयाची दिली आणि आठ दिवसांचे आंत राजीनामा व कबुलायत झाली ह्मणजे रुपये रोख मोजून घ्यावे असा करार दोन महिन्या पूर्वीं झाला व शेत तुमचे स्वाधीन करून दिलें. पुढें लागलीच राजीनामा कबुलायत करण्याविषयीं आह्मी तुह्मांस निकड लाविली तेव्हां तुह्मी लांबणीवर गोष्ट टाकली व शेवटीं स्पष्ट सांगितलें कीं आह्मी रुपये देत नाहीं व आह्मांस शेत नको. त्यावरून तुह्माला या नोटिशीनें मुद्दाम कळवितो कीं शेताची झालेली खरेदी आतां माघारी होणार नाहीं व रुपये व्याजा सुद्धा तुह्माला द्यावे लागतील. तुह्मी शेत चार चौघांचे समक्ष ताब्यांत घेतलें व आह्मी तुह्मास इतकेंच कळवितो कीं नोटिस पोचल्या पासून १५ दिवसांचे आंत आमचे २०० रुपये व्याजा शुद्धा व या नोटिशीच्या खर्चा सुद्धा आमचे दुकानीं आणून द्यावे. असें तुह्मी न कराल तर कायद्या प्रमाणे तुह्मांवर दिवाणी कोर्टांत फिर्याद केली जाईल व तिचा खर्च ही मग तुह्माला द्यावा लागेल कळावें तारिख ७ माहे आगष्ट सन १८७४ इसवी.

( सही )जमनादास बनीचंद दुकान सारगाव नेहू वहिवाट दार गणेश विठल दस्तूर खुद.

———

नोटिस—कोर्ट नंबर ४ जिल्हा अकोले याजकडून नंदराम पिकणीवाला राहणार डोंगरगड जिल्हे रायपूर यास तुह्मावर गुलाबराय गोविंदराम साहू दुकान अकोले याणें नंबर ४चे कोडतात रुपये ११७८३८९ची फिर्याद केलेली नंबर ३१ सन १८७४ची फैल झाली त्यातील समन्स तुह्मास गेले असोन न भेटता चुकवाचुकवी करिता असी कोडताची खात्री झाली त्यावरून कळविण्यांत येते कीं या फिर्यादीचा जाब देण्यास तारीख १९ माहे आगष्ट सन मजकुरी हजर न झाला तर एकतर्फे निकाल केला जाईल तारीख ८ माहे आगष्ट सन १८७४ इसवी.

[ सहो ]आर बुलक साहेब अ० क०

नोटिस—विठ्ठल जयराम पांडे राहाणार पेठ मुर्तीजापूर यांस खाली सही करणारणीकडून नोटिस देण्यांत येते कीं सुमार दोन वर्षें झालीं तुह्मी मला आपल्या ताबेदारींत ठेवून दरसाल १०० रुपये देण्याचा करार केला असें असतां कांहीं दिलेनाहीं. भरवसा दाखवून जपण्याकरीतां ह्मणून माझे दागिने सुमार २०० रुपये किमतेचे तुह्मी आपले जवळ ठेविले होते व मी ही विश्वासुकपणा समजून तुमच्यापाशीं ते राहू दिले होते पण तुमची बेमानी माझे मनांत येतचालली तसे मी आपले दागिने तुह्मास मागुलागले तेव्हां तुह्मी दंडेलीच्या गोष्टी सांगितल्या त्यावरून तुह्मावर फिर्याद करण्याकरितां मी कारंजास गेले तेव्हां तुह्मी माझी समजी केली आणि दागिने माझे हवाली केले. व त्याचवेळीं माझे २०० रुपयाबद्दल गावीं जातांच रुपये देतो असें सांगितलें व तारीख १० माहे जुलई सन मजकूर रोजीं ष्टाप कागदावर एक करारनामा लिहून दिला; त्याला महिना होतआला त्याप्रमाणें तुह्मी रुपये दिलेनाहीं, मेहनतीत घटकाभर आळस केला नाहीं व मुशाहिऱ्याबदल दमडीच्याकवड्या दिल्यानाहींत अस्तु याप्रमाणें तुह्मी कराल असा भरवसा नव्हता. परंतु ही तुमच्या लायकीची गोष्ट आहे. अल्पवयी मी भोळी माणूस तुमच्या पाऊणशे वर्षाच्या वयावर न नजर देतां घरच्याप्रमाणें सर्व व्यवस्था तुमची राखली; असें असतां तुह्मी माझा असा बेभरवसा केला ही तुमच्या अब्रूस मोठी बढती समजली पाहिजे; जी गोष्ट फार गुप्त ठिकाणी दोघाखेरीज तिसरे मनुष्याचा वाराही नसतां झाली ती आतां तुमच्या या कृत्यामुळें हजार लोकांच्या तोंडी यावीं व त्यांत तुमची अप्रतिष्ठा व्हावी येथपर्यंत मजल तुह्मीच आणली ह्मणून ही नोटिस देणें भाग झालें आतां या नोटिशीनेंही १५ दिवसांचेआत माझे रुपये न येतीलतर दिवाण दरबार मला करावे लागेल व त्याचा खर्च आणि या नोटिशीचा खर्चही तुह्मास द्यावालागेल सबब अजून तरी घरगुती रितीनें उलगडा करावा. इतक्याउपर परमेश्वर तुह्मास बुध्धी देईल ती खरी. कळावे तारिख ७ माहे आगष्ट सन १८७४ इसवी.

[ सही ]रुखमायी मर्द हणमंतराव इचे हातची बांगडी.

## वर्तमानसार

खंडव्या नजीक रेलवे पुलाचे दोनदां मोठे पूर येऊन नुकसान झालें व गाड्यांची खोटी झाली.

मुंबईच्या स्मालकाज कोर्टाचे चवथे जडज रा. बा. कृष्णाजी लक्ष्मण यांनीं रजा घेतली आहे त्यांचे जागेवर रा. रा. गणपतराव भास्कर वकील यांस अक्टिंग नेमिलें.

चीनदेशांत हांगकांग येथें थोड्या दिवसांपूर्वी धरणीकंप झाला असें वर्तमान आलें आहे.

आह्मांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं रा.रा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांस मुंबईचे कायदे कौसलांत मेंबर नेमिलें.

हिंदुस्थानचे गवरनर जनरल लार्ड नार्थ ब्रूक साहेब यांस विलायतेस परत बोलाविणार अशी गुल उठली आहे.

विलायतेंत उलवीच येथें एक मोठी तोफ तयार केली आहे तिचें वजन ८० टन आहे. तिची लांबी २९ फूट व तोंडाचा व्यास २९ इंच आहे. साऱ्या पृथ्वींत एवढी मोठी तोफ नाहीं असें ह्मणतात.

ग्रेट सदर्न आफ इंडिया नावाच्या रेलवे कंपनींचे प्यासेंजरचे पाहिल्या क्लासाचे मैलास बारा पै व तिसऱ्या क्लासाचे १ पै असे दर आहेत,

अमेरिकेंत पेनसिलवेनिया प्रांतांत नद्यांनां मोठाले पूर आले व तेणें करून अतिशय नुकसान झालें अशी खबर आली आहे. २०० मनुष्यें ही प्राणास मुकलीं.

शेतकरी लोकांच्या मुलानां शेती संबंधी ज्ञान शिकविण्या करितां शाळेदाखल एक शेतीचा कारखाना काशीस नेटिव गृहस्थानें काढण्याची तजवीज चालविली आहे. असें आग्रया कडील पत्रावरू कळतें.

मुंबईइलाख्यांत मनीआर्डर खात्याचें गुदस्तसालीं मागील प्रमाणें चांगलें काम चाललें नाहीं व उत्पन्न कमी झालें असें कागदपत्रावरून समजतें.

ब्रह्म देशांतील एक तरुण गृहस्थ विलायतेस बारिस्टर होण्यासाठीं जात आहे.

बंगलोर येथे मेयो फंडाची रकम २०००० रुपये जमली आहे त्या फंडानें तेथें टौनहाल बांधावा व त्यास मेयो साहेबाचें नाव द्यावें असा तेथील लोकांचा विच्यार आहे.

हिंदुस्थानांतून थेट विलायतपर्यंत रेलवे करण्याचा विचार चालू होता तो बेत रशियासरकारास पसंत वाटला नाहीं व त्यांनीं त्यास पुष्टीकरण करण्याचें सोडून दिलें.

जगन्नाथाची पुरी येथें या वर्षी रथजत्रा ६००००जमली होती.

डा० भाऊ दाजी यांचे रक्तपितीवरील उत्तम औषध त्यांचे मरणा मागें नाहींसें झालें नाहीं. तें भाऊनीं आपण आजारी असतांच आपले बंधू डा० नारायण दाजी यांस सांगितलें आहे. व त्यांकडून कित्येक रोग्यावर त्याचा प्रयोगही करून पाहिला आहे व हल्लींही तें औषध डा० नारायण हे आजाऱ्यांस देत असतात

रत्नागिरीचे सबार्डिनेट जडज रा. बा. चिंतामण सखाराम यांस कच्छची दिवाणगिरी मिळाली. पगार १५०० रुपये.

अमदाबादचे सावकार बेचरदास अंबाईदास यांस मुंबईच्या कायदे कौंसलांत मेंबर नेमिलें.

ब्रम्ह देशांत रेलवेचें काम सुरू झालें.

हिंदुस्थाना करितां व सिव्हलद्वीप वगैरे करितां तांब्याचें नाणें विलायतेच्या टंकशाळेंतून तयार करून आणण्याचा ठराव झाला.

जगन्नाथाची पुरी येथें व त्या रस्त्यावर महामारीचा आजार उद्भवल्याचें वर्तमान आहे.

बंगाल इलाख्यांत या वर्षी नीळ ८०००० मण होईल असा अजमास झाला आहे.

कलकत्त्यास कलकत्ता मादिरासा या नावाची शाळा सन १७८१ मध्यें वारन हेस्टींग्स साहेबानीं स्थापन केलेली 'अजून चालू आहे. तिजमध्यें ६०३ विद्यार्थी आहेत. पैकीं १८१ आरबी शिकतात. व बाकीचे इंग्रजी आणि पारशी शिकतात या शाळेंत सर्व बंगाल्यांतून व बहार, आराकान, रंगून वगैरे कडून विद्यार्थी शिकावयास येतात.'

सुरतेचे माजी डिपुटी कलेक्टर मि० मोतीराम दलपतराम हल्लीं कच्छेस आहेत त्यांनीं तिकडील कामाचा राजीनामा दिला. व हजार रुपये पगारावर बडोद्यास आले. नवसरीचे सुभे रा० रा० बाळा साहेब खारकर यांस राजीनामा देण्याची परमाणगी मिळाली आहे सबब त्यांची जागा यांस मिळावी अशी इच्छा आहे.

कलकत्त्यास डा० भाऊ दाजी यांसाठीं कांहीं स्मारक कृत्य होण्याची वाटाघाट चालली आहे हें ऐकून आह्मांस फार संतोष वाटतो.

बडोद्याचे दिवाण मि० दादाभाई नवरोजी तीन महिन्यांची रजा घेऊन विलायतेस जाणार असें समजतें.

मुंबईस एक मोठी दुःखाची गोष्ट झाली ती अशी कीं, आन० नारायण वासुदेव ह वाळकेश्वरीं आपल्या बंगल्यांत असतां अकस्मात दिवाणखाना पडून त्याच्या खालीं दबून मरण पावले. त्यांच्या बरोबर आणखी दोन मनुष्यें मेली.

पुण्यामध्यें जीं सुधारणुकीचीं कामें चाललीं आहेत त्यांत अशी सूचना झाली आहे कीं लोकांत उत्पन्न होणाऱ्या तंट्याच्या पंचाइती करण्याकरितां प्रत्येक गल्ली मध्यें एकेक मंडळी नेमावी, व त्या मंडळीनें आपल्या हद्दींत होणाऱ्या तंट्यांचे निवाडे करावे. ज्ञा. द.

इंग्लंड व युरोप—इंग्लंडची राज्यव्यवस्था जरी प्रथम पासून वाईट ह्मणण्या सारखी नव्हती तरी सांप्रत प्राचीन काळचा मोठेपणा राहील किंवा नाहीं ह्याविषयीं पुष्कळ राजधुरंधर पुरुषांस काळजी पडली आहे. कारण एक आस्ट्रिया खेरीज इंग्लंडाशीं कोणचेंच युरोपातील राष्ट्र लागू नाहीं. रशियाचा व इंग्लंडचा स्नेहभाव ह्मणण्या सारखा नाही. कारण तहनाम्या प्रमाणें रशिया मुळींच न चालतां वाटेल ते वक्र्या गोष्टींत इंग्लंडशी स्नेहभाव धरून, नाहीं त्यांत इंग्लंडास थप्पड मारण्यास मागें पुढें पहात नाहीं. जर्मनीचें व इंग्लंडचें तर नीट नाहींच. कारण सर्व जर्मन वर्तमानपत्रें इंग्लंडच्या नावानें हाक मारीत आहेत. फ्रान्स तर रागानें धुमसतच आहे. स्पेन मध्यें सर्व गोंधळच झाला आहे. राजपुत्र बिस्मार्क देखील इंग्लंडचे विरुद्धच आहे. इटली तर कर्ज बाजारी होऊन बसली आहे. तेव्हां सारांश इतकाच कीं इंग्लंडची स्थिति आज फार वाईट आहे आतां ती म्हणजे सुधारतां येणार नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं. तथापि अशांत सुधारली तर बरी, नाहीं तर सर्व युरोपांत इंग्लंडचें नाक खालीं होण्याचा प्रसंग येईल. हिंदुस्थानचा मात्र इंग्लंडास तूर्त मोठा आधार आहे. ज्ञा. च.

मद्रास इलाख्याच्या जुडिशियल खात्याच्या रिपोर्टावरून समजतें कीं गुदस्त सालीं जमा १९३०००० रुपये झाली व खर्च १५००००० रुपये झाला.

## सदसद्विवेक.

( तारिख २६ जुलैच्या अंकावरून पुढे चालु. )

सारांश, मनुष्याला इतकें अवश्य दिसतें कीं कोणतेंही चांगलें किंवा वाईट काम करण्यापूर्वीं त्यानें विचार करावा ह्मणजे सदसद्विवेकाची सला घ्यावी. तसें केल्यानें जें चांगलें व जें करण्यास योग्य तेंच करण्याविषयींची सला सदसद्विवेक देतो. व त्या प्रमाणें लागलीच वर्तन करावें. दुसरे दुर्वृत्तींचा उठाव मध्यें होऊच देऊ नये. व झाल्यास त्याचें दमन करून विवेकासच अनुसरावें. आपला एकादा बिकट मुकद्दमा असला तर त्यांत आपण चांगल्या बारिष्टराची सला घेतो व तो सांगेल तसेंच करितो आणि तसें करणें हाच विधी आहे. नाहीं तर कोणी मनुष्य बारिष्टरास विच्यारून आला नंतर एकाद्या अडाणी धनगरास तीच गोष्ट त्यानें विच्यारिली व त्याचेच सल्या प्रमाणें वर्तन केलें तर त्याचे मुकद्दम्याचा कसा परिणाम होईल हें उघड आहे; त्याचप्रमाणें सदसद्विवेक हा बारिष्टरा प्रमाणें खरी चांगली व अचूक अशी आपणास सला देतो, आणि जर ती आपण बाजूस ठेवतो आणि लोभ, मोह, हेका, आवेश, द्रोह इत्यादि अडाण्यांचे सांगण्याप्रमाणें वागतो तर आपण आपल्या सुखकर परिणामास मुकू व आपल्यावर नाना प्रकारच्या अडचणी ओढऊन घेऊ हें साहजिक दिसतें.

ईश्वराचे सर्व नेम व हेतु मनुष्यास कळणें अशक्य आहे व त्याचे विच्यार अतर्क्य आहेत ह्मणून आपणास बहुत गोष्टी पुरत्या कळत नाहींत. सदसद्विवेक जी सला देतो ती दुसऱ्या दुर्वृत्ती कां मोडितात व सदसद्विवेकाचें कां चालू देत नाहींत, व सदसद्विवेकाचे ठायीं दुर्वृत्तिदमनाची शक्ती ईश्वरानें कां ठेविली नाहीं हें आपणास समजत नाहीं. निदान या निबंध लिहिणारास तरी समजत नाहीं व समाधानकारक कांहीं सांगतां येत नाहीं, तथापि आपण इतकें ह्मणू कीं चांगलें वाईट कळणें, व चांगल्याच आचरणाविषयीं आपणास प्रथम दर्शनीं सला मिळणें ही गोष्ट कमी महत्वाची आहे असें नाहीं व ती ज्या मनोवृत्तीपासून मिळते ती पराकाष्ठेची निर्मळ आहे किंवा कदाचित ईश्वरांश आहे असें ही आपणास ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं. व अशी एक उत्तम देणगी कृपाळु परमेश्वरानें मनुष्यास दिली आहे हे त्याचे जगतावर मोठे उपकार आहेत. तो या मनोवृत्तीच्या द्वारें मनुष्याचें कर्तव्य, काय? त्यास उत्तमता किंवा अधमता कशानें येईल, व ईश्वराचा या सृष्टिरचनेंत हेतु काय याचा बऱ्याच अंशीं मानवास बोध करितो ही गोष्ट अल्प स्वल्प आहे काय? नाहीं. अत्यागत्याची आहे. ह्मणून सदसद्विवेक आपणास जी आज्ञा करितो ती ईश्वराची आज्ञा असें मानून निमुटपणें आपण मानून ती प्रमाणें वर्तन करावें हें आपलें मुख्य काम आहे. एक दोन प्रसंगी तसें करण्यास अवघड गेलें तर जुलमानें तसें करावेंच ह्मणजे पुढें वळण पडेल व मग आपणास त्याच्या आज्ञे बाहेर वागावें असें सहसा वाटणार नाहीं.

एकंदर दुनियेचें वळण चांगल्यापेक्षां वाइटाकडे झुकत असल्याचें प्रस्तुत काळास विशेष दिसून येतें. कारण कोणत्याही गावांत पाहिले असतां सत्पुरुष अथवा सन्मार्गवर्ती लोक थोडे आढळतात. यावरून पुढें काय होणार व ईश्वराची इच्छा काय आहे तें कळत नाहीं. चोरी करणें वाईट आहे असें सदसद्विवेक सांगतो पण शेजाऱ्यानें आपला कांहीं मौलवान जिन्नस उघडा ठेऊन तो कुलूप न लावितां बाहेर गावीं गेला आहे तर त्यांतून कांहीं तरी घ्यावा अशी इच्छा करणारे फार; परस्त्रीचा अभिलाष वाईट असें सदसद्विवेक सांगतो पण परस्पर नजरानजरीनें एकवाक्यता झाली ह्मणजे उल्लू होऊन आगींत उड्या घालणारे फार; खोटें बोलूनये असें सदसद्विवेक सांगतो पण तंतोतंत खरें सांगितल्यानें आपला फायदा बुडतो आहे तर कानावर हात ठेवणारे किंवा खोट्या साक्षी देणारे फार; अशा अनेक गोष्टी कोठवर सांगाव्या? मनुष्याच्या जिवापेक्षां मोलवान दुसरें कांहीं नाहीं तर" आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्" असें नीती ह्मणते व हत्या करूनये असें सदसद्विवेक सांगतो पण दहा दहा पाच पाच रुपयांच्या दागिन्याच्या लोभाकारितां शेकडो बालकांचे वध कित्येक कालिपुरुषांनीं केले आहेत व आपले स्वतांचे जीवही त्याकरितां धोक्यांत घातलेले आहेत तेव्हां अशा स्थितीस काय ह्मणावें? प्रभु सत्ता प्रमाण! दुसरें कांहीं नाहीं. प्रत्यक्ष ईश्वराच्या आज्ञेचादेखील लोक अवमान करूलागले आहेत तर मग ईश्वराची प्रतिमा जी सदसद्विवेक वृत्ती तिचा अवमान करतील यांत नवल नाहीं. पण हें त्यांचें करणें परम निंद्य आहे व परिणामा ईश्वराजवळ त्यांनां या गोष्टीचा जबाब द्यावा लागेल. ह्मणून प्रांजलपणानें सर्वांस मी इतकेंच सुचवितो कीं मित्रहो तुह्माला तुमचा सदसद्विवेक जी अनुज्ञा करितो तीच तुह्मी माना व तिच्याप्रमाणेंच वर्तनक्रम ठेवा, त्यांत तुमचें हित होईल पाठीमागून उठणाऱ्या दुर्वृत्तीच्या श्रेणीच्या भरीं भरूनका त्या तुह्माला भयंकर पाशांत नेऊन गोवितील व तेणेंकरून तुमचें फार अनहित होईल. अहाहा! काय सांगावें! या सुधारत चाललेल्या जगा मध्यें वास, सुखावह वस्तूंची विपुलता, मनुष्यजन्मासारखा उत्तम जन्म, सदसद्विवेकानुरूप वर्तन, भूतदया, ईश्वर भक्ती, आणि सदा शांती, इतक्यांचा येथेंच परमेश्वरकृपेनें संच जमला तर मग स्वर्ग सुखाची कोण चाड बाळगील? व इंद्राच्या देवांगना येथेंच येउन आमची चरणसेवा कां न करतील? अहाहा! तशाप्रसंगीं आह्मी येथेंच कृतकृत्य आहोत असें प्राणिमात्र ह्मणतील. असा दिवस सर्वांकरितां कधीं उगवेल काय? आणि उगवेल तर तो दिवस धन्य! धन्य! धन्य! असें आपण सर्व ह्मणू व परमेश्वराचा स्तुतिवाद करूं.

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERD NO7,1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १६ माहे आगष्ट सन १८७४ इ० अंक ३३

## जाहेरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

नोटिस—सुकदेव वलद रावजी मानकर राहणार कसबे वाडेगाव तालुके बाळापूर व मौजे महागाव तालुके अकोले यास खाली सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको आसोन लग्न झाल्यास सुमार १२ वर्षे झाली त्यादिवसापासून फक्त सुमार २ वर्षेपर्यंत तू मजला आपले घरीं नेलेस नंतर मजला माझे बापाचे घरीं ह्मणजे पुंजाजी पाटील याचे घरीं पाठविलेस. पुन्हा मजला नांदविण्यास नेले नसोन तू मजला न कळता दुसरें लग्न केलेस व मजला जनसिरस्तेप्रमाणे नांदवित नसोन दुसरे बायकोचे ताब्यांत रहाण्यास सांगितलेस व दुसरे तऱ्हेने गैरर्वतणुकीची गोष्ट सांगतोस ती मजला कबुल नाही याजबद्दल माझे बापाने तुझे गावी येऊन पंचाईत केली आहे यास्तव नोटिस देते कीं मी आपले बापाचे घरीं सुमारे १०वर्षे आहे त्याचा खर्च दरसाल रुपये ६० प्रमाणे रुपये६०० व माझे बापाने मजला दिलेले दागिने तू घेतलेस ते दागिने आगर त्याची किंमत रुपये १२ असे १५ दिवसांचे आत देऊन फारकत द्यावी व रुपये व दागिने पावल्याची पावती घ्यावी याप्रमाणें सदरहू मुदतीचे आंत तू न वर्तल्यास या नोटिशीचे खर्चासुद्धा कायद्याप्रमाणें तजावीज केली जाईल मग तुझी कोणतेही प्रकारे सबब आइकली जाणार नाहीं कळावे तारीख ६ आगष्ट सन १८७४

( सही )वजू ऊर्फ लक्ष्मी मर्द सुकदेव मानकर हली वस्ती माटरगाव इची निशाणी बांगडी असे.

---

नोटिस—रामचंद्र श्रावगी मारवाडी रहाणार ताजनापेठ यास खाली सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी जवसीचा माल खंडी २ दोन दर ७० रुपये प्रमाणे भिवराज व बलदेव दलाल यांचे मार्फतीनें देण्याचा ठरविला व माल आमचे पदरांत मोजून घालून रुपये घ्यावयाचे असें असतां हल्लीं जो माल तुह्मी देता तो भिजलेला असोन अगदी खराब आहे. आमचा ठराव असे मालाचा नाहीं. चांगले मालाचा आहे सबब आह्मी हा घेतनाहीं व नोटिशीने कळवितो कीं दलालाचे मार्फतीनें जसा चांगला माल देण्याचा कबूल केला तसा तुह्मी नोटिस पावल्यापासून चार दिवसांत आह्मास मोजून द्यावा नाहीं तर तुह्मावर दिवाणीत दावा करून खर्चासुद्धा भरून घेण्याची तजविज करू तारीख १० माहे आगष्ट सन १८७४

[ सही. ]आनंदो रतनसींग भाटे मुंबईकर दस्तुर खुद्द

---

नोटिस—पुंजाजी वल्लद दानाजी पोलिस पाटिल वस्ती मौजे मोरगाव सादीजनचे तालुके बाळापूर यास खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आज तीन वर्षे झाली ह्मणजे सन १२८१ चे साली सरकारी वायदा न पटल्यामुळें सर्व गावकरी लोकासमक्ष तुह्मी तुमचे शेत आकार रुपये २०चे मजला विकले असोन सदरहू वायद्याचे रुपये मी सर्व गावकरी यांचे समक्ष तुमचे बदला दिले व राजीनामा करून द्यावा ह्मणोन मी ह्मटले असता तुह्मी सांगितले कीं मी राजीनामा करून देतो तुह्मी गावचे पोलिसपाटील असीन जबान बदलणारनाहीं असी खात्री बाळगून मी तुमचे शेतात नांगरठी करून सर्व शेत उत्तमप्रकारचे केले व त्यास खर्च भाड्याच्या जोड्या वगैरे अजमास रुपये ४०० लागला आहे अता तुमची नियत शेत पाहून बदलली आहेवराजीनामा देत नाहीं तुह्मी व पांडे एक होऊन मजला बुडविण्याचा विच्यार केलाआहे करितां ही नोटिस दिली आहे तर माझा जो वाजवी खर्च गावांतील लोकांसमक्ष झाला आहे तो सदरील रुपये ४०० मजला द्यावे व शेत घ्यावें शेतसारा मी तीनवर्षे देतअसोन वहिवाटही मी करीतआहे तुह्मी मजला न विच्यारतां वाही वगैरे मी केलीअसता तुह्मी पेरणी केली शेत जबरदस्तीनें घेऊ पहाता याबद्दल मी दिवाणी कोर्टांत फिर्याद करून शेत आगर रुपये घेणार सबब अगाऊ ही नोटिस दिली आहे याचा जबाब पंधरा दिवसात द्यावा व नोटिसिचा खर्च तुह्मास द्यावालागेल कळावे तारीख १ माहे आगष्ट सन १८७४ इसवी.

( सही )परशराम वल्लद नारायण टेकाळे वस्ती मोरगावसाधीजन तालुके बाळापूर दस्तुर खुद्द.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वाशिमाहून— वि० वि० खालीं लिहिलेला मजकूर येत्या अंकीं प्रसिद्ध केल्यास मोठी मेहरबानी होईल.

येथील तहशिलदार मि० सादत मीर खान यांची बदली पुसदास झाली यांच्या सन्मानार्थ तारीख २८ जुलै रोजीं जनरल लायब्ररींत सभा भरली होती गावांतील मंडळीं पेक्षां सरकारी कामदार पुष्कळ जमले होते. रा. रा. विनायकरामचंद्र यांनीं निबंध वाचला तो फार चांगला होता पहिला निबंध वाचणें झाल्यावर दुसरा रा. विठ्ठल जनार्दन कारकून यानीं वाचला तोही साधारण बराच होता. नंतर तहशिलदार यानीं मुसलमानी भाषेंत चांगले प्रकारें भाषण केलें. ज्या प्रमाणें सादत मीर खां यानीं लोकांचा स्नेह संपादिला त्या प्रमाणें दुसरे तहशिलदार संपादन करतील अशी फार आशा आहे. अध्यक्ष स्थानीं मि० अबदूल हक साहेब होते. त्याना या निबंधानें कसे वाटलें असेल कोण जाणे.

गावच्या दक्षिणेस कमिटीनें तारदखाने तयार करविले आहेत त्यात गावांतील बहुत लोक परसाकडेस जातात व भंगी सफा करावयास जात नाहींत तेणेंकरून तेथील काय व्यवस्था झाली असेल कोण जाणे. गवत सुमारें गुडघ्या बरोबर वाढलें आहे व पाणी बाहेर जाण्यास मार्ग चांगला नसल्या मुळें चिखल फार झाला आहे. या प्रमाणें पैसा खर्च करून अशी व्यवस्था करणें कमिटीला कसें बरें वाटत असेल तें असो. माजी सेक्रेटरी विनायकराव याणीं हे तारदखाने तयार करावेले आहेत व हल्लींच्या सेक्रेटरीस त्यांची व्यवस्थाही ठेवणें होत नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. वास्तविक पाहिलें असतां भंगी लोक कमिटीचे नोकर आहेत मग सफाई कां होत नाहीं कोण जाणे. हल्लीं ज्याप्रमाणें भिंती पडल्या आहेत त्याप्रमाणें तारदखान्यांची व्यवस्था होईल असें दिसतें. इकडे सेक्रेटरी लक्ष पुरवितील तर फार चांगलें होईल.

एथील ए. अ. क. मि. अबदुल हक साहेब यांचे कचेरींत रामराव अपाजी वकील प्रतिवादी तर्फे बोलत असतां अबदुल हक साहेबानी सदहू वकिलावर "दुराग्रह" हा शद्ब बोलल्या बद्दल चार्ज ठेऊन त्याच वेळेस दोन शे रुपये दंड करून सांगितले कीं दंड न दिल्यास एक महिन्याची कैद; नंतर वकील याणें लागलीच रुपये मोजून दिले. हर! हर! येवढ्या क्षुल्लक गोष्टींत या विच्याऱ्यावर ए. अ. क. नीं आपला पूर्ण अधिकार बजाविला हे चांगलें केलें नाहीं. वकिलानीं डे. कमिशनर साहेब यांजकडें अपिल केलें त्यावरून १८० रुपये दंड माफ झाला. सदहू कोर्टांत सदहू वकील यास शेकडा आठ आणे फीव इतर वकिलास शेकडा तीन रुपयेफी मिळते असें समजतें. याजला आठ आणेच कां मिळत असतील कोण जाणे.

वाशिमकर

"क्ष"

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० खालीं लिहिलेल्या दोन ओळी कृपा करून लोकहितार्थ प्रसिद्ध करावया.

अकोल्यास प्रति रविवारीं भरणारी एक सभा दोन वर्षांपासून स्थापन झाली आहे हें आपणास माहित असेलच. तिचें कामही पाहिलें चांगलें चालत असे. पुढें कांहीं महिनें तिला कुंभकर्णाची झोप लागली होती तींतून च्यार आठवडे झाले नुकतीच ती जागृत झाली आहे. तेव्हां हिचें काम पहिल्याहून अधिक चांगलें चालेल अशी आशा होतकरू विद्यार्थ्यांना आशा होती पण ती सफल होईलसें दिसत नाहीं. कारण पाहिले प्रमाणें कित्येक विद्वान गृहस्थ अलीकडे सभेला येत नाहींत. व कालच्या सभेच्या मानावरून पाहिलें तर ते येत नाहींत हें बरेंच करितात असें मला वाटतें. कारण एक दोन दुह्वाच्यार्य थोर गृहस्थ भाषण प्रसंगीं इतके एकेरीवर आलेले दिसले कीं त्यांनीं प्रतिपक्षा कडील बोलणारांचा उपमर्द वाकूताडणेंकरून बराच केला व हातांत काठ्या ! होत्याच त्यांचा उपयोग करणें मात्र शिलक ठेविलें. असें होऊ लागल्यास सभेला न जाणें हेंच चांगलें असें सर्वांस वाटेल. महाराज ते जो धंदा करितात त्याच्या संबंधानें बोलणें निघाले त्यांत ते दुसऱ्यास असें ह्मणाले कीं वांझेला कातबोळाची माहिती नसते त्याप्रमाणें यांना या प्रकरणाची माहिती नाहीं, ह्मणून आमचीच गोष्ट खरी आहे. व ती कोणती ह्मणाल तर साहेब लोक रागिट असतात त्यांची तबेत संभाळण्यासाठीं प्रसंगानुसार खोटें बोलत जावें. भाषणाप्रमाणें कृति ठेवण्याचें गृहस्थधर्मास साधत नाहीं. सबब "बोले तैसा चाले" हें हरदास व पुराणीक यांनीं मात्र करावें असें ते ह्मणाले. व त्यांचेच मताचे त्यांचे एक मित्र ह्मणाले कीं तुकारामाच्या या उपदेशाला जंगलांत नेऊन सोडावें. व्यवहारांत, नोकरींत वगैरे बोलल्या प्रमाणें चालणें घडणार नाहीं एवढेंच नाहीं, आपल्या बायको जवळ देखील थापा मारल्या शिवाय गत्यंतर नाहीं व त्या प्रसंगीं स्त्रीविषयक भाषणविलासाचें कथन करण्यास व दुसऱ्या वक्त्याचें तद्विषयक अज्ञान दाखविण्यास पुढें सरसावले होते पण खैर झाली कीं अध्यक्षांनीं त्यांस मनाई केली. नाहीं तर तो एक अद्भुत रस पाघळता!

ही सभा प्रत्येक सभासदाची सुधारणा व्हावी अशा साठीं आहे व ही चांगली चालली तर आह्मा विद्यार्थ्यांवर हिचे फार उपकार होतील यांत संशय नाहीं. परंतु हठवाद, दुराग्रह, खोट्यामताचा बुध्या स्वीकार हे दोष यांत नसले पाहिजेत, निदान विद्वान व थोर ह्मटले जाणारे यांच्यांत तरी नसावेत. कारण अल्पवयी, अल्पज्ञानी, अल्पविच्यारी असे जे आह्मी विद्यार्थी त्या आमचा येणें करून असा ग्रह होणार आहे कीं थोर थोर लोकांचीं मतें जर खरें बोलूनये, बोलल्याप्रमाणें चा

लू नये, प्रसंग पाहून नीति सोडावी अशीं आहेत तर तीं कदाचित खरीं असतील व यांचें अवलंबन आपणास अयोग्य नाहीं.

एडिटर साहेब खरेंच याप्रमाणें सर्वकाल होऊ लागेल तर आह्मा विद्यार्थ्यांचा बिघाड होणार आहे, व त्याचा दोष व त्याच अशीं सभेवर येणार आहे. तर तसें होऊ नये ह्मणून माझी विनय पूर्वक ईश्वरा जवळ प्रार्थना आहे. व पूर्वोक्त सभासदानीं माझ्या लेखाचा घुसा न करितां सभेस येत जावें व तिचें काम सुरळीत चालवावें अशी त्यांस विनंती आहे. कळावें तारीख १० माहे आगष्ट रोज सोमवार

एक विद्यार्थी.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुध्द ४ शके १७९६

## बडोद्याचे राज्याविषयींचा सरकारचा ठराव.

बडोद्याचे राज्यांत आली कडील महाराज श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांचे कारकीर्दींत फार अव्यवस्था झाली व चोहोंकडून बोभाट झाले ह्मणून हिंदुस्थान सरकारानें त्या प्रकरणाची चौकाशी करण्या करितां एक कमिशन नेमिलें होतें हें आमचे वाचकांस ठाऊकच असेलच. त्याला सुमार आठ महिने झाले. या कमिशनानें जो रिपोर्ट केला होता तो हिंदुस्थान सरकारानें पाहून व त्याची नकल गायकवाडास देऊन त्यांचे त्याज विषयीं ह्मणणें ऐकून घेऊन ठराव केला त्यांतील तात्पर्य :— बडोद्याचे राज्यांत फार अव्यवस्था झाली आहे तरी सन १८७४ चे जुलाई महिन्या पासून सन १८७५ चे डिसेंबर महिन्या पर्यंत १८ महिने श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांस आपले राज्याची सुधारणा करण्यास सवड दिली आहे. इतक्या काळांत त्यांनीं योग्य दिसेल तसे नवे जुनें करावें. दिवाण व इतर कामदार नेमण्याची किंवा काढण्याची त्यांस मुकत्यारी आहे. कसेंही करून राज्यांतील अव्यवस्था त्यांनीं मोडावी. व सुरळीत रितीनें राज्य चालवावें, बोभाट कोणत्याही राजकीय वाईट गोष्टीचा राहूं देऊ नये. व या प्रमाणें त्यानीं केलें व तसा कर्नल फेर साहेब रेसिडेंट यानकडून रिपोर्ट झाला ह्मणजे श्री० मल्हाररावानीं बडोद्याचे गादीचा आपला हक्क शाबीद केला असें समजलें जाईल व त्यांकडे पुढें तें राज्य कायमचें चालविलें जाईल. आणि कदाचित त्यांनीं १८ महिन्यांत चांगल्या प्रकारें राज्याची सुधारणा केली नाहीं व हल्लींचीच स्थिति कायम राखिली व तसा रेसिडेंट कडून रिपोर्ट झाला तर ते राज्यास नालायक आहेत असें समजून त्यांस पदच्युत केलें जाईल व बडोद्याच्या राज्याची इंग्लिश सरकारच्या इच्छेप्रमाणें व्यवस्था केली जाईल. मग मल्हाररावांची कसलीही तक्रार ऐकिली जाणार नाहीं इयादि.

या प्रमाणें सरकारचा नुकताच ठराव झाला आहे. आतां या विषयीं विच्यार करून पाहतां हा ठराव ह्मणण्या सारखा मल्हाररावाच्या विरुध्ध नाहीं. त्यांच्या वाईट वर्तणुकीची पराकाष्टेची ओरड झाली असतां व कमिशनानें मल्हारराव राज्यकारभार चालविण्यास केवळ अयोग्य आहेत असें स्पष्ट कळविलें असतां इंग्लिश सरकारानें उदार मनानें मल्हाररावांनां १८ महिन्यांची सवड दिली हें फार शहाणपणाचें काम केलें यांत संशय नाहीं. आतां इतक्यावरही मल्हारराव न उमजतील तर त्यांचें दुर्दैव समजावयाचें. या ठरावाचें कांहीं फल झालें नाहीं तर सन १८७६ च्या जानेवारींत मल्हाररावास बाजीराव पेशव्या प्रमाणें ब्रह्मावर्तास किंवा काशी क्षेत्रीं जाऊन "हरि हरि" करीत स्वस्थ बसावें लागेल व एवढ्या राज्यवैभवास आपण होऊन त्यांनां मुकावें लागेल. परमेश्वर काय घडवील तें खरें. कसें होईल या विषयीं कांहीं निश्चय सांगतां येत नाहीं.

श्री० मल्हारराव मनाचे चांगले आहेत व गडबडले ह्मणजे शुध्धीवर येतात पण जुन्या दुष्ट, भ्रष्ट व अपमतलबी कामदारांचें जे चक्र त्यांच्या भोंवतीं आहे तें त्यांनां शुध्धीवरच येऊ देत नाहीं, ह्मणून सर्व लंगडें आहे. इंग्लिश सरकाराकडून येकादें दुट्टें मागें लागलें ह्मणजे ते गडबडतात व शुध्धीवर येतात आणि सुधारणा करूं पाहतात पण तो प्रसंग थोडा मागें पडला ह्मणजे "पहिले पाढे पंचावन" अशी त्यांची स्थिति होते. कमिशन नेमण्याची इंग्लिश सरकाराकडून तजवीज झाली तेव्हां मल्हाररावानीं विलायतेहून मि० दादाभाई नवरोजी यांस बोलावून आणिलें व ते बडोद्यास आले तेव्हां तुह्मी राज्याची सुधारणा करावी, मी तुमच्या धोरणानें वागेन, असें ह्मणाले. त्याप्रमाणें दादाभाईनीं सुधारणेचा पाया घालून बाहेरून तीन हुशार गृहस्थ बोलाविले. इतक्यांत महाराजाभोंवतालच्या जुन्या मंडळीनीं कावकाव केली व आपल्या सर्वांच्या पोटावर पाय आल्याविषयीं रडून गाऱ्हाणीं गायलीं, त्याबरोबर मल्हाररावांचें मन त्यांकडे वळून त्यांनीं दादाभाईला सांगितलें कीं बाहेरून मनुष्यें आणण्याचें आतां तकूब करावें. तसेंच दादाभाईला दिवाण नेमिलें मात्र, परंतु त्यांनां अधिकार किती दिला आहे ह्मणाल तर येका कारकुनाला किंवा शिपायाला त्याच्या वाईट वर्तणुकीवरून बरतर्फ करूं ह्मटलें तर तें देखील त्यांच्या हातीं नाहीं, त्याला मल्हाररावांचें सांगशन पाहिजे. मग अशा अशाश्वतीच्या जागीं व चंचल मनुष्यापाशीं दादाभाई सारख्यांच्या राहाण्यापासून उपयोग काय? दादाभाई व त्यांचे मित्र यांचे बडोद्याखेरीज उदरनिर्वाह होत नव्हते असें नाहीं. त्यांनीं अशी स्थिति पाहून भडाभड राजिनामे दिले. इतक्यांत सरकाराचा हा ठराव झाला तेव्हां मल्हाररावांचें मन पुन्हा गडबडलें व शुध्धीवर आलें. आतां मल्हारराव दादाभाईस व त्यांचे मित्रास आपआपले कामावर कायम राहण्याविषयीं आग्रह करीत आहेत व नानाप्रकारचीं वचनें देत आहेत. परंतु या वचनांत अर्थ काय? अशीं मागें त्यांनीं अनेक वेळा अनेक प्रकारचीं वचनें दिलीं असतील परंतु त्यांतून येकही पुरें झालें नाहीं. याचें कारण काय? महाराजांचें मन अस्थिर व त्यांभोंवती कावेबाज जुन्या लोकांचा पाळा मोठा, तो त्यांस उपरती होऊं देत नाहीं. व नव्या जुन्या कामदारांची बडोद्यांत पुढील १८ महिनेही अशीच सांगड राहील व मल्हाररावांच्या मनाचे तरंग कांहीं महिने जुन्या लोकांकडे व कांहीं महिने नव्या लोकांकडे वळत जातील तर परिणामास काठिण जाऊन मल्हाररावास धोतर झटकून महायात्रेचा रस्ता धरावा लागेल कीं काय कोण जाणे! हर हर! असा प्रसंग न यावा. अहाहा! जे मल्हारराव आज औरस चौरस दोन हजार कोसांच्या राष्ट्राचे, पाच लाख लोकांचे, व एक कोट रुपयाच्या वसुलाचे मालक आहेत. हत्ती, घोडे, पालख्या, सोनें, रुपें, जवाहिर वगैरेची कुबेराप्रमाणें संपत्ती ज्यांच्या घरी दासीपरी रावतआहे ते मल्हारराव शहाण्या लोकांच्या सूचनें व सुविचारानें वागणार नाहींत तर १८ महिन्यांनीं त्यांचे तें सर्व वैभव त्यांजकडे राहीलकाय? राहणार नाहीं. याचा त्यांनीं स्थीर मनानें विच्यार करावा, व तो करण्यास परमेश्वरानें त्यांस सन्मति द्यावी.

अजून गोष्ट आवाक्या बाहेर गेली आहे असें नाहीं. मल्हाररावांनीं अविद्वान, दुराचारी, कावेबाज, लुच्चे, व भोंदू अशा जुन्या कामदार लोकांस आपल्या राष्ट्राच्या बाहेर घालवून द्यावें. यां विषयीं अगदी गय करू नये. हा माझा मेहुणा, हा माझा नाकांतला बाल असें ह्मणून त्यां पैकीं कोणास जवळ करूं नये. त्यांपासून कधीं चांगलें होणार नाहीं. मि० दादाभाई नवरोजी यांस कायमचे दिवाण करावें व त्यांच्या सल्यानें लक्षपूर्वक स्वतंत्र राज्यकारभार करण्यास आपण शिकावें व इंग्लिश राज्यांतून नवे चांगले चांगले लोक आणून त्यांची मोठमोठ्या महत्वाच्या कामावर योजना करावी, व रयतेचीं गाऱ्हाणीं ऐकावीं, आणि तिला सर्व प्रकारें सुखी करावें. इतकें श्रीमंत मल्हारराव महाराजांनीं आस्थापूर्वक केलें असतां त्यांची गादी कायमची होईल, व हिंदु राजाविषयीं टीका करणारांचीं तोंडें बंद होतील, महाराजांस लोक दुवा देतील व इह लोकीं आणि परलोकीं त्यांची कीर्ति होईल.

## वऱ्हाड परत जाण्याविषयीं पुन्हा शंका.

जी गोष्ट अत्यंत महत्वाची, व राजकीय ह्मणून गुप्त असणारी तिजविषयीं वेगवेगळे वेळीं वेग वेगळ्या प्रकारचीं वर्तमानें निघतात त्यास उपाय नाहीं. त्या कामीं वर्तमानपत्रकर्त्यांचें एवढेंच कर्तव्यकर्म आहे कीं शोधपूर्वक तीं मिळवून वाचकांपुढें ठेवावीं.

वऱ्हाडप्रांत कंटिंजेंट फौजेच्या खर्चा करितां इंग्लिश सरकारच्या अमानतींत आहे, ती खर्चास लागणारी रकम आह्मी रोख देतो व आमचा प्रांत आह्मांस परत द्यावा अशा विषयीं निजाम सरकारानीं इंग्लिश सरकाराशीं मागणें केल्याची आज दोन वर्षे वार्ता आहे त्या संबंधानें समजलेली माहिती व आह्मी आपले विच्यार एक दोन वेळां कळविले आहेत पुढें वऱ्हाड परत देऊ नये असा सरकारचा ठराव झाल्याचेंही एका मोठ्या ठिकाणाहून कळलें होतें तें आह्मी प्रसिद्ध केलें आहे. त्या नंतर आतां अलीकडे जी खबर आहे ती अशी:—

इंडियन स्टेटसमन नावाच्या पत्रकर्त्यानें सन १८५३ च्या व सन १८६१ च्या अशा दोन्ही तहनाम्यांतील ठराव लिहून आपलें असें मत कळविलें आहे कीं निजाम सरकारास वऱ्हाड प्रांत परत घेण्याविषयीं विच्यार करण्यास जागा नाहीं टाइम्स पत्रांत लिहिलें आहे कीं निजाम सरकार आग्रहानें वऱ्हाड प्रांत परत मागत आहे व त्यास तो मागण्यास योग्य कारणें आहेत. तसेंच दुसऱ्या कांहीं माहिती वरून अरुणोदयांत लिहिलें आहे कीं वऱ्हाड प्रांताविषयीं वर्तमान पत्रांतून उगीच चर्चा चालू आहे. निजाम सरकारच्या ध्यानीं मनीं देखील ती गोष्ट नाहीं. कोणी तरी गप उठविली असें चौकशी अंतीं कळून आलें आहे.

तेव्हां आतां यांतून खरें कोणतें ? निजाम सरकारानीं मागणें केलें हें खरें, किंवा त्यांनां कांहीं ठाऊक नाहीं हें खरें? तसेंच त्यांनां मागण्याचा हक्क नाहीं हें खरें, किंवा ते मागत असून हे देत नाहींत हें खरें? याचा निर्णय इतक्यांत कांहींच सांगवत नाहीं. तथापि आह्मांस इतकेंच वाटतें कीं टाइम्सचें लिहिणें नेटिवांच्या तर्फेंच असतें. व त्यानें या महिन्याच्या ४ थ्या तारखेस आपल्या एडिटोरियल कालमा खालीं जो लेख लिहिला आहे तो सयुक्तिक दिसतो व त्यावरून असें कळतें कीं निजाम सरकारानीं आग्रहपूर्वक वऱ्हाडप्रांत परत मागितला आहे व तो मागण्यास त्यांनां इतका अधिकार आहे कीं तो त्यांनीं मागितला असतां राखून ठेवण्याचा इंग्लिश सरकारास नीतीच्या दृष्ट्या मुळींच हक्क नाहीं. व या गोष्टीचे प्रतिपादनाकरितां त्यांनीं सन १८५३ च्या तहनाम्या पूर्वीची गोष्ट लिहिली आहे. तिच्यांतील तात्पर्य असें:—

निजाम सरकारावर इंग्लिश सरकारानें सन १८५३ च्या तहनाम्याच्या वेळीं जें कर्ज येणें काढिलें तें कर्ज मुळींच कांहीं नव्हतें. व रीती प्रमाणें हिशेब पाहिलेह्मणजे कदाचित निजाम सरकारचेंच इंग्लिश सरकारावर फाजील निघेल. फौजेच्या खर्चां करितां निजाम सरकाराकडून पैसा येणें त्याजबदलचें कर्ज असें इंग्लिश सरकारचें ह्मणणें आहे. पण फौजेला पैसा देणें कोणत्याही तहनाम्यावरून निजाम सरकाराला भाग नाहीं असें स्पष्ट आहे. व तुंगभद्रेच्या दक्षिणे कडील मुलूख टिपु सुलतानाकडून निजाम सरकारास मिळाला तो त्यांनीं इंग्लिश सरकारास दिला तेव्हां

त्यांचे यांचे असे ठराव झाले कीं इंग्लिश सरकारच्या फौजेची निजाम सरकारास जे व्हां जेव्हां गरज लागेल तेव्हां तेव्हां नि० स० कडून कांहीं खर्च न घेतां इं० स० नीं आपली फौज त्यांच्या मदतीस देत जावी.

ह्मणजे सन १८०० सालीं जो तहनामा झाला आहे त्यांतील १७ वें कलम असें आहे कीं निजाम सरकारच्या प्रजे पैकीं कोणी सरकारचे कर देणार नाहीं किंवा बदफैल होऊन दंगा करील तर सबसीडायरी ह्मणजे कुमकेकरितां निजामाकडे असलेल्या इंग्लिश फौजेनें त्याचा बंदोबस्त करावा. आणि इंग्रज. सरकारच्या हद्दी जवळच्या निजाम सरकारच्या टापूंत कांहीं दंगा होईल व तो मोडण्या. करितां निजामाला इंग्लिशांच्या फौजेचें कारण लागेल व ते मागतील तर इंग्लिशांनीं आपली फौज त्यांचे सहायास द्यावी. तसेंच ७ वे कलमांत स्पष्ट लिहिलें आहे कीं निजाम सरकारचे कुमके करितां इंग्लिश सरकारची जी सबसीडायरी फौज निजाम सरकाराजवळ राहील तिचे खर्चा बद्दल निजाम सरकारचे खजिन्यावर कधीं बील होऊ नये.

या प्रमाणें ठराव असतां कांटिंजेंट फौज कशी उत्पन्न झाली व तिचा खर्च निजामापासून कसा घ्यावयाचा ठरविला तें कळत नाहीं. व त्याला कोणत्याही तहनाम्याचा आधार दिसत नाहीं. व ही गोष्ट निजाम सरकार सन १८५३ सालीं इंग्लिश सरकारास समजाऊन सांगत असतां दंडेलीनें व भय दाखऊन त्या सालीं नवा तहनामा फौजेच्या खर्चाच्या कर्जा बद्दल वगैरे करविला. व निजाम सरकार सही करीत नव्हते तेव्हां पुण्याहून लश्कर आणून हैद्राबाद सर करून घेण्याचा निश्चय झाला आहे व त्या प्रमाणें पुण्यास हुकुम गेले आहेत अशी त्यांस दहशत घालून तहनामा सही करून घेतला आहे तो नीतीच्या दृष्ट्या गैरकायदा होय.

कुमकेच्या फौजेनें जें काम करावयाचें व ज्याजकरितां तिला पूर्वीचि मुशाहिऱ्या बद्दल मुलुख मिळाला आहे तें काम दुसऱ्याच कांटिंजेंट फौजेकडून करऊन तिच्या खर्चाचा बोजा निजाम सरकारावर घालून त्यांचा उत्तम पिकाऊ प्रांत घशा खालीं उतरला ही युक्ती राज्यहरण करण्याचें कामीं परम दक्ष जे लार्ड डालहौसी साहेब त्यांची होय व त्या प्रसंगीं त्यांचे साथीदार हैद्राबादचे रेसिडेंट जनरल फ्रेजर यांनीं तर आपली सला अशी लिहिली होती कीं निजाम सरकारचें सारें राज्य कांहीं वर्षें आपल्या सत्तेत ठेवावें.

तेव्हां अशा प्रकारें घेण्यास वाजवी कारण नसतां मुलूख घेतला आहे असें निजाम सरकार दाखवितात. व तें त्यांचें ह्मणणें नीतीच्या दृष्टया रास्त आहे तरी सन १८५३ सालीं जो तहनामा पुरा होऊन गेला. व उभय सरकारच्या राजीखुशीनें झाला असें त्यांत स्पष्ट ह्मटलें गेलें आहे व त्या प्रमाणें २० वर्षें मुलुख ताब्यांत दिला आहे. व सन १८६१ सालचा दूसरा तह झालेला आहे त्यांत हल्लीं निजाम सरकार दाखवित असलेल्या गोष्टींचा लेश सुध्धा नाहीं तेव्हां गतगोष्टी सांगत बसून उपयोग नाहीं. तथापि तहनाम्यावरूनही पाहता जर फौजेच्या खर्चाकरितां मुलूख घेतला आहे तर तो खर्च निजामसरकार नक्त देण्यास राजी झाले असतां इं० स०नीं मुलूख त्यास परत द्यावा हा विधी होय. व हें नि० स०चें मागणें राजनिष्ठेबाहेर नाहीं. तसेंच वऱ्हाडप्रांत फार मोलवान आहे खरा परंतु बदनाम करून तो राखून ठेवणें इं० स० स बरें नाहीं असें टाइम्स आफ इंडियाचें ह्मणणें आहे.

आतां तहनाम्याचें पुस्तक आमचे पाहण्यांत नाहीं ह्मणून विशेष खात्रीनें आह्मास कांहीं सांगतां येत नाहीं तरी १८०० आणि १८५३ याच्या मध्यंतरी गेलेल्या वर्षांत कांहीं तहनामे झाले नसतील असें आह्मास वाटत नाहीं. व आमचे एक दोन मित्रानीं आह्मांस सांगितलें आहे कीं फौजेच्या खर्चाच्या संबंधाचे ठराव मध्यंतरी कांहीं झाले आहेत. व यास मि० लायल साहेब यांच्या ग्रंथांत वऱ्हाडचा इतिहास लिहिला आहे त्यांत प्रमाण मिळतें. इरेग्युलर फोर्स नावाच्या फौजेबद्दल खर्च येणें असें त्यांत लिहिलें आहे. व कुमकेच्या ह्मणजे सबसिडायरी फौजे शिवाय ही फौज निराळी आहे व तिलाच पुढें हैदराबाद कांटिंजेंट असें नाव दिलें आहे.

निजाम सरकारानें मागणें मागितलें आहे त्याबद्दल आह्मांस आता एक शब्द लिहावयाचा आहे तो हाः—मागण्यामध्यें करुणा भाकावी लागते व मागण्या पासून देणाराचे मनांत दया उत्पन्न झाली पाहिजे तर तें मागणें सफल होण्या विषयीं अधिक भरवसा असतो. तर या प्रसंगीं नि० स० नीं मागल्या उखाळ्या पाखाळ्या काढिल्या असतील तर त्या बऱ्या नाहांत. आह्मी तुमचे देणेंदार नव्हतो, तुह्मी आह्मांवर जुलूम केला, भय घातलें, अन्याय केला, या विषयीं विच्यार करा.व आमचा मुलूख आह्मांस परत द्या; असें ह्मणणें कदाचित गैर वाजवी नसलें तरी कायैसाधुत्वाच्या तरी थोडें आड येण्या जोगें आहे असें आह्मांस वाटतें.

## वऱ्हाड.

कर्नल बेल साहेब जुडिशियल कमिशनर इलिचपुरचे सेशनाकरितां गेले होते ते शुक्रवारीं परत आले. आतां सोमवारीं यवतमाळचे सेशनाकरितां जातील. तें सेशन चांदुर आणि यवतमाळ याचें दरम्पान कोली ह्मणून गाव आहे तेथें नेमिलें आहे. व मुकदमे दोन आहेत.

—ooo—

जिल्ह्यानिहायचे डिपुटी कमिशनर उमरावतीस जमले होतेते शुक्रवारीं आपआपले जिल्ह्यास परत गेले. क्या० हडलस्टन साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर व क्या० फिटझरल्ड साहेब वाशीमचे डिपुटी कमिशनर शुक्रवारीं येथें आले व शनिवारीं आपआपले जिल्ह्याकडे गेले.

—ooo—

इलिचपुरचे लोकलफंड इंजिनियर मि० नारायण बाबाजी जोशी यांस पब्लिक वर्क्स खात्याकडे सब इंजिनियर नेमिलें. व ते उमरावतीस आले.

—ooo—

आह्मांस लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं उमरावतीचे डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर रा० रा० चिमणाजी राजाराम पाठक ३।४ महिने आजारी होते तो त्यांचा आजार तसाच वाढून कालच्या शनिवारच्या मागील शनिवारीं रात्री त्यांस देवाज्ञा झाली. चिमणाजी पंत यांस २०० रुपये पगार होता व जरी ते आली कडील ग्राजुएट वर्गा पैकी नव्हते तरी हुशार असून आपले कामांत दक्ष व पराकाष्ठेचे मेहनती होते. व त्यांचे भर तारुण्यांत त्यांस मृत्यूनें गाठिलें याजबद्दल फार विस्मय वाटतो.

चिमणाजी पंतानीं धुळ्याचे इंग्लिश स्कुलांत प्रथम अभ्यास केला नंतर सन १८५९ सालीं ते पुण्यास गेले व तेथें कांहीं वर्षें अभ्यास करून पुढें मंडलेश्वरास मास्तर झाले. तेथून पुढें खंडव्यास ट्रेझरी क्लार्क झाले. नंतर तेथेंच डिपुटि इन्स्पेक्टर झाले व पुढें तहशिलदार झाले. नंतर सन १८६७ सालीं ते वऱ्हाडांत आले व कांहीं वर्षें मेहकरास व पुढें उमरावतीस ते डिपुटि इन्स्पेक्टर होते. गुदस्तां ते ईस्ट इंडिया रेलवे कडे प्रवासास गेले होते व त्या पूर्वीं एक वेळ मोगलाईत गेले होते. त्यांचें वय सुमार ३७ वर्षांचें होतें. त्यांचें मरण त्यांच्या इष्टमित्रास व इकडील शाळा खात्यास मोठे खेदास कारण झालें. पण ईश्वरी इच्छे पुढें कोणाचा इलाज नाहीं.

शाळाखात्यांत चिमणाजी पंतांचे मरणानें नेमणुका झाल्या त्याः—रा० रा० बाळकृष्ण शास्त्री बापट १५० रु०चे बुलढाण्याचे डि० इ० यांस २०० वर उमरावतीस नेमिलें. इलिचपुरचे १२५चे डि० इ० रा० रा० वामन गणेश परांजपे यांस बुलढाण्यास १५० रु०वर नेमिलें. मलकापुरचे १२५ रु०चे हेड मास्तर रा० रा० बळवंत नृसिंह यांस इलिचपुरास त्याच पगारावर डि० इ० नेमिलें. रा० रा० वामन प्रभाकर पराजपे ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल यांस १२०चे १२५ करून मलकापुरास नेमिलें. मि० नूरखा उमरावती हायस्कुलांतील १०० रुपयांचे असिस्टंट मास्तर यांस १२० रुपयांवर ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल नेमिलें. आतां उमरावती हायस्कुलांतील १००ची जागा खाली आहे तिजवर लखनौकडून कोणी मुसलमान गृहस्थ येणार आहेत. या नेमणुका डा० सिंक्लर साहेब यांनीं फार विच्यार पूर्वक व चांगल्या केल्या असें आह्मांस वाटतें.

—ooo—

देउळगावराजा येथील स्कूलमास्तर रा० रा० गंगाधर सिताराम शास्त्री यांची बदली झाली त्याप्रसंगीं गावकऱ्यांनीं मोठी सभा करून त्यांस एक शालीचें फर्द व मानपत्र दिलें त्याविषयीं सविस्तर मजकुराचें पत्र आह्माकडे आलें आहे तें आह्मी पुढील अंकांत घेऊ. आमचे मित्र गंगाधर शास्त्री तेथील लोकांस इतके आवडत होते व त्यांनीं त्यांचा असा बहुमान केला हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

देऊळघाटाहून तेथें गेलेले आमचे मित्र रा. रा. गंगाधर रामचंद्र हेही हुशार आहेत व यांच्या योजनेनें ती शाळा चांगली सुधारेल अशी आह्मांस उमेद आहे. व मुलांची संख्या आतांच वाढू लागल्याचें सदहू पत्रावरून कळत आहे.

---

येथील कित्येक क्रिश्चन क्लार्क वगैरेलोकांनीं काल रात्री टौनहालांत इंग्लिश पद्धतीचा एक खेळ केला. तो पहाण्यास इंग्लिश व नेटिव लोक बरेच जमले होते.

—ooo—

रा० रा० सखाराम दत्तात्रय जळगावचे तहशिलदार यांनीं एक महिन्याची रजा मागितली होती ती त्यांस मिळाली आहे पण घरगुती कांहीं अडचणीमुळें ८।१५ दिवस ती अमलांत आणण्याचा त्यांचा विचार नाहीं. बदली काम पाहण्याकरितां मि० शाबासखान यांची योजना झाली आहे व ते बरेच दिवस जळगावास जाऊन बसले आहेत.

---

रा. नथो लक्ष्मण वकील यांचे घरीं त्यांच्या घरच्या गड्यानें भरदिवसां माडीवरील पेटी घेऊन जाऊन चोरी केली. पेटींत नक्त रुपये, नोटी, व माळ वगैरे सुमार साडे तीनशे रुपयांचा विषय होता. त्या गड्याला मूर्तिजापुरचे स्टेशनावर पकडला तेव्हां त्याजपाशीं नक्त रुपये व माळ सापडली. बाकी जिनसांकरितां दुसरा एक मनुष्य त्याचा भागीदार आहे असें ह्मणतात तो पकडला आहे पण त्याजपाशीं माल अजून मिळाला नाहीं. नवक्या गडीमनुष्यावर फार नजर ठेवणें, व इतकाला विषय हातपेटींत उघड्यावर न ठेवणें सर्वांस अवश्य आहे असें आह्मांस वाटतें.

---

खामगावाहून पत्र आल्या वरून कळतें कीं तिकडे पाऊस चांगला पडून हल्लीं उघाडी झाली आहे— ज्ञानप्रदीप नावाची दर रविवारीं तेथें एक सभा भरू लागली आहे. व तिचें काम बऱ्याच उमेदीनें चालतें. नवीन हेडमास्तर मि० सुंदर दामोदर यांची या सभे विषयींची खटपट आहे व ती बरीच सफल होईल असें दिसतें— कापडाची एक गिरणी आणण्याचे कामीं इकडील व्यापारी लोक शेर भरीत आहेत. व पुढें उपक्रम चालू आहे. परिणाम काय होईल पाहावा.

---

### मागाहून आलेली नोटिस

नोटिस— बापूजी गुरव वस्ती कुरणखेड तालुके अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे आमचे शराकतीत बेपार असून त्या संबंधी वहिवाट माहे जुलै सन १८७२ ईसवी महिन्यात माझे स्वाधीन तुह्मी केली त्या वहीत पहाता तुमचे कडेस बाकी आहे त्याजबद्दल दोन च्यार वेळ तगादा केला असतां देऊ देऊ असे सांगत गेले यास्तव हा नोटिस देण्यात आली आहे तर नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आत रकम द्यावी न दिल्यास नोटिशीचे खर्चासुद्धा घेण्या विषयीं तजवीज करू. तारीख १४ माहे आगष्ट सन १८७४ इसवी

(सही) यशवंत जगन्नाथ कुळकर्णी
कुरणखेड

## वर्तमानसार

वर्ध्याहून एका मित्राचें पत्र आल्या वरून समजतें कीं तेथें कित्येक पुढारी लोकांनीं एक लायब्ररी नवीन स्थापन केली आहे तशीच स्नेहवर्धक नावाची एक सभा ही तेथें जमत असते पर्जन्य उत्तम प्रकारें पडत आहे. कपाशी व जवारीचे पेरे होऊन तीं पिकें उत्तमावस्थेत आहेत— गावांत व आसपास ताप व खोकला हा आजार फैलावत आहे— येथें मुनासिपल आक्ट सुरु केला आहे तो लवकरच अमलांत येईल.

नदीला मोठा पूर आला व तेणेंकरून फार नुकसान झालें कित्येक जीव गचावले व बाजरीचीं पिकें सारीं बुडालीं.

सिंध कराचीकडे जाकोबाबाद येथेंही नदीला पूर येऊन फार नुकसान झालें लष्करी छावणी वाहून जाईल या भयानें तीं दोन कोस पलीकडे नेली आहे.

मेणकापड करण्याची कृति— चुलीवर लोखंडाची कढई ठेऊन अग्नी द्यावा. ती तापल्यावर पक्का एक शेर मेण त्यामध्ये घालावें ह्मणजे पानाला चुना लागेतोंपर्यंत तें कढतें. कढून पाणी झालें ह्मणजे त्यांत निंबाचा रस एक शेर घालून कढवावें. मग तिळाचें तेल कच्चे दोन शेर घालावें. नंतर मेणकापड ज्या रंगाचें करावयाचें असेल तो रंग त्यामध्ये घालून कढई चुलीवरून खालीं उतरावी. थोडी थंड झाल्यावर घट्ट कापड घेऊन त्यावर घालावें. आणि खालीं वर करून चांगल्या घोटणीनें घोटावें ह्मणजे मेणकापड तयार होतें. पर्जन्यकाळीं परदेशांत माल पाठविणें झाल्यास वरती हें कापड बांधून पाठविलें असतां पाण्याचा बिंदुही लागणार नाहीं.

विलायतचा व्यापार— गेल्या जुलै महिन्यांत विलायतेहून २१,१२,५०,००० रुपयांचा माल बाहेर गेला आणि ३२७९,००,००० रुपयाचा माल विलायतेस आला असें कळतें.

विलायतेंतील हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी व त्यांच्या हाताखालची मंडळी या सर्वांचे पगार व नेमणुका वगैरे मिळून गेल्या मार्च अखेर एक वर्षाचा १४,५४३९० रुपये खर्च झाला. या रकमेपैकीं स्टेट सेक्रेटरी, दोन अंडर सेक्रेटरी व पंधरा कौन्सिलदार मिळून सर्वांबद्दल २,६५,००० रुपये खर्च पडला आहे असें कळतें.

मिठाविषयीं सरकारचा हुकूम— गेल्या सरकारी ग्याझेटांत तारीख १२ मिनहूचा सरकारचा असा हुकूम प्रसिद्ध झाला आहे कीं, मुंबई इलाख्यांतील कोणत्याही ठिकाणाहून हिंदुस्थानच्या ठिकाणास सन १८६९ च्या २४ व्या आक्टाअन्वयें वगैरे पूर्ण जकातीचा पैसा भरल्या खेरीज मीठ नेण्याची परवानगी तारीख १ आक्टोबरपासून दिली जाणार नाहीं.

विलायतेंत नीति किती व कशी वाढत आहे— आमच्या लोकांस अनीतिमान ह्मणणाऱ्या इंग्रज लोकांच्या देशांत प्रति आठवड्यास चार लक्ष ह्मणजे दर वर्षास दोन कोटि आठ लक्ष अनीतीच्या पुस्तकांच्या प्रति निघून दर चार पै पासून बारा पै पर्यंत किमतीनें विकल्या जातात असें हिं. पे. कर्त्यांनीं विलायतेंतील एका नज्ञाच्या ह्मणण्यावरून लिहिलें आहे.

युनिवर्सिटीच्या परीक्षा— यंदाच्या मुंबईच्या माट्रिक्युलेशन परीक्षेस तारीख १६ नोवेंबर रोजीं आरंभ होईल. उमेदवारांचे अर्ज व फी बद्दल दहा रुपये तारीख १६ व १७ सेप्टेंबरच्या आंत रेजिस्ट्राराकडे दाखल झाले पाहिजेत. बी. ए. च्या परीक्षेस तारीख २३ नोवेंबर रोजीं आरंभ होईल. अर्ज व फी बद्दल तीस रुपये तारीख २३ सेप्टेंबरच्या आंत पोंचले पाहिजेत. एल. एल. बीच्या परीक्षेस तारीख १६ नोवेंबर रोजीं सुरुवात होईल. अर्ज व फी बद्दल पंचवीस रुपये तारीख १६ सेप्टेंबरच्या आंत रेजिस्ट्राराकडे गेले पाहिजेत. सिविल एंजिनियरिंगची परीक्षा व एल. सी. ई पदवीची परीक्षा या ता. २३ नोवेंबर रोजीं सुरू होतील आणि अर्ज व फीबद्दल अनुक्रमे दहा व पंचवीस रु० ता. २३ सप्टेंबरच्या आंत पावले पाहिजेत. एल. एम. ची दुसरी परीक्षा व एम. डी. च्या पदवीची परीक्षा यांची सुरवात ता. ३० नोवेंबर रोजीं होईल आणि अर्ज व फीबद्दल यथानुक्रमें पंचवीस व शंभर रु० रेजिट्रार यांजकडे ता. ३० सप्टेंबरच्या आंत दाखल झाले पाहिजेत.

निजामाच्या मुलखांत कोळशाच्या खाणींचा उद्योग चालला आहे. गोदावरीच्या उजव्या बाजूस बद्रचलम गांवापासून चार पांच कोसांवर निजामच्या कोळशाच्या खाणीचे सुपरिन्टेंडेंट मि. हीनान यांनीं जमीनीस भोकें पाडून झपाट्यानें शोध चालविला आहे. एका ठिकाणीं ३२० फुटाच्या खोलीवर कोळशाचा चांगला थर सांपडला आहे. दुसऱ्या ठिकाणीं शोध चालविला आहे. इं. प्र.

चीन येथील अपराधी लोकांस शिक्षा देण्याचा प्रकार ऐकून निदान सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांच्या अंगावर कांटा आल्या शिवाय रहाणार नाहीं. चिना सारख्या देशांत ही चाल अद्यापि कशी जारी असेल हें समजत नाहीं. कांहीं दिवसां पूर्वीं एक तरुण स्त्रीवर खून केल्याचा गुन्हा फक्त एका मुलीच्या जुल्मानें घेतलेल्या साक्षीवरून, शाबीद करून आरोपी स्त्रीस देहांत शिक्षा झाली. इंग्रजी राज्यांत फक्त बंडाच्या वेळेस मात्र तोफेच्या तोंडीं देऊन जीव घेण्याची शिक्षा देत असत व हल्लीं फाशी देण्याची वहिवाट सुरू आहे. परंतु चिनांत अंगाचे तुकडे करून प्राण घेणें यास कायद्यानें देहांत शिक्षा ह्मणण्याची चाल आहे. तिकडील अपराध्यांस देहांत शिक्षा देण्याचा प्रकार एका इंग्लिश पत्रकर्त्यानें असा लिहिला आहे कीं, अपराध्यास प्रथमतः वधस्तंभास बांधून नंतर त्याच्या चेहऱ्याची कातडी काढण्यास प्रारंभ करतात !! त्याच्या शिरा बाहेर काढतात, हात पायांचीं बोटें कापतात !! स्त्री असल्यास तिचे स्तन कापतात!!! आणि वर सांगितलेल्या प्रकारचे हाल करूनही जीव न गेला तर त्यांचीं आतडीं बाहेर काढितात! देहांत शिक्षे शिवाय दुसऱ्या लहान गुन्ह्यास देखील क्रूर शिक्षा असतात. चाप लावणें, कांचेचा चुरा करून त्यावर गुढघे टेकावयास लावणें, ह्या सामान्य शिक्षा आहेत !!

कारवार व गदग स्टेट रेलवे करण्याविषयींचा विचार सरकारानें तूर्त तहकूब ठेविला आहे.

मारशल बाझेन यांची फ्रान्सच्या तुरुंगांतून सुटका होण्याची युक्ति त्यांच्या स्त्रीनें काढली होती असें समजतें. अ. द.

## हिंदुलोकांची राजकीय योग्यता.

(पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेंतील भाषण.)

आपले हिंदुलोकांस राजकीय अथवा सार्वजनिक कामें स्वतंत्रपणें करण्याची योग्यता कितपत आहे? या प्रश्नावरमी बोलणार आहे. हा विषय फार अगत्याचा आहे व सांप्रतकालास विच्यारणीय असा आहे. ह्मणून सालमजकुरीं हा निवडून काढिल्याबद्दल बहुतेकांस संतोष झाला असेल.

याविषयीं कोणास असें वाटेल कीं पृथ्वीवर बहुत प्रकारचे देश आहेत व त्यांत कांहीं अतिनिकृष्ट असेही आहेत, तरी ते सर्व आपआपले राज्यकारभार स्वतंत्रपणें करिताहेतच, आणि आपला हिंदुस्थान देश तर राज्यकार्य कौशल्यांत मोठा विख्यात होता व त्याच्या संपत्तीस आणि ईतर वैभवास अन्य देशचे लोक भुलले होते व त्यांनीं त्यावर घाले घातले होते. असा हा नामांकित असतां यांतील लोकांस याची राजकीय अथवा सार्वजनिक कामें कां करतां येणार नाहींत? व तीं करण्याची त्यांस कां योग्यता नसेल? असली पाहिजे; ह्मणून हा प्रश्नच संभवत नाहीं. कारण आबिसिनिया देशांतील हबशीही आपला राज्यकारभार स्वतंत्रपणें चालवितात. दुसऱ्या देशच्या लोकांस मदतीस बोलावित नाहींत. मग आह्मी हिंदुलोक हबशापेक्षांही निकृष्ट झालों कीं काय? असें कोणास वाटेल. परंतु या प्रश्नांत तसा भावार्थ नाहीं. हिंदुस्थानांत प्राचीनकालीं कित्येक राजे अति उत्तम होऊन गेले. हें या वक्तृत्वाचा प्रश्न आपणापुढें ठेवणारास चांगलें ठाऊक आहे.

दशरथराजाचा पुत्र रामचंद्र यानें सर्वोत्कृष्ट रीतीनें राज्य केलें. त्याचे राज्यांत "छत्रेषु दंडः कुसुमेषु बंधः" ह्मणजे छत्रीला मात्र दंड, फुलाला मात्र बंधन, सोंगट्यांनां मात्र हाण मार, त्याशिवाय मनुष्यांनां दंड करणें, बांधणें, मारणें ह्या क्रिया ठाऊक नसत. ह्मणजे त्याच्या राज्यांत प्रजा इतकी संतुष्ट व सुतृप्त असे कीं अपराधाकडे तिची प्रवृत्ती नसे व त्यामुळें कोणाला सदहू प्रकारचें शासन होत नसे.

तसाच भारतवंशांत धर्मराज ह्मणून राजा होऊन गेला त्याची राज्यरीति फार उत्तम असे. भारत ग्रंथांत विदुरानें नीति सांगितलेली आहे तशीच भीष्माचार्यानीं राज्यनीति सांगितलेली आहे ती आमच्या कित्येक विद्वान मंडळीस चांगली ठाऊक असेल. त्या काळीं प्रजेला सर्वोपरी सुख देणें हाच काय तो राजाचा मुख्य धर्म मानित असत व उपदेष्टेही राजाजवळ तेंच घोषण करीत. एकानें ह्मटलें आहे कीं:—

श्लोक.

प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा ॥ नृपा तूं करी फार सांभाळ याचा ॥ स्ववत्साचिया जाण वात्सल्य योगें ॥ अभीष्टार्थ ही भूमि देईल वेगें ॥ १ ॥

सारांश अशी ज्यांची प्रजा पालनाविषयींची दक्षता त्यांचे आपण अग्रज आहों व तशा प्रकारच्या या नामांकित हिंदुस्थानांत आपण जन्म पावलेलो आहों. व अलिकडील काळचेही राजपुरुष शिवाजी महाराज, व पेशवे थोरले माधवराव, सदाशिवराव भाऊ इत्यादि प्रतापि पुरुषांचें वळण आपण पहात आलेले आहों तर आपणास कशा तरी प्रकारें राज्य चालविण्याची स्वतंत्र योग्यता असावी किंवा नाहीं? याविषयीं प्रश्नाकर्त्यास मुळींच संशय नाहीं. हें आपले लक्षांत चांगलें असावें.

तेव्हां प्रस्तुतचा प्रश्न योग्यतेविषयीं जो आहे तो जुन्या पध्दतीच्या अनुरोधाचा नाहीं. तो नवीन राज्यरीतीच्या वळणाचा आहे. जुन्या लोकांच्या कानास राजकीय हा शद्ब जितका सुगम असेल तितका सार्वजनिक हा नसावा. कारण राजकीय कृत्यास सार्वजनिक वळण पूर्वकाळीं नव्हतें असें दिसतें. जरी प्राचीन काळीं मोठाले कीर्तीमान राजे झाले तरी ते राजे ह्मणजे सर्वांचे मालक आणि प्रजा ह्मणजे जशा कांहीं राजाच्या उपयोगार्थ तयार असलेल्या वस्तु असा त्यांचा प्रकार असे. प्रजांनीं सार्वजनिक संबंधानें राजाच्या कामास सहाय द्यावें, किंवा राज्यसंबंधांत कांहीं बोलावें किंवा राजानें प्रजेची संमती घ्यावी असा प्राचीनकाळीं आपल्या देशांत प्रच्यार होता असें ऐकण्यांत नाहीं. आणि कदाचित असला तर निदान अलिकडे ह्मणजे मुसलमानांचे प्राबल्यापासून या सुमार एक हजार वर्षें तरी तो प्रकार आपल्या देशांत माहित नाहीं असें ह्मणण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. रयतेनें नेमून दिलेला अथवा मान्य केलेला तो राजा होय. राजाबरोबर राजकीय गोष्टीचा विच्यार करण्यास गावागावानें नेमून दिलेले मुख्त्यार राजसभेंत बसले पाहिजेत. राज्य चालविण्यास लिहिलेले व प्रसिद्ध केलेले कायदे पाहिजेत, कोणताही कायदा करण्यापूर्वीं त्याचा हेतु व मसुदा प्रजेस दाखविला पाहिजे, पुढील सालीं आपण जमा व खर्च काय करणार त्याचीं टिपणें राजानें प्रजेपुढें ठेविलीं पाहिजेत. एकटा राजा आपले इच्छेनें राज्य कारभारांत कांहींएक करूं शकत नसतो इत्यादि उत्तम नियम परराष्ट्रांत आहेत व त्यांकडून त्यापैकीं कांहीं कांहींचा आपणास लाभ होऊ लागला आहे. इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी या देशांत हे व असे दुसरे पुष्कळ उत्तम नियम पाळिले जातात व त्यामुळें तिकडे प्रजेला फार मोठी स्वतंत्रता आहे व त्यांच्या नेमनिष्ठेंत कांहीं चुकलें तर प्रजा राजावर शस्त्र धरते अशाही गोष्टी तिकडे घडल्या आहेत. तिकडे कांहीं राज्यें केवळ प्रजासत्ताक आहेत व कांहीं मिश्रसत्तेचीं आहेत ह्मणजे राजा आणि प्रजा यांच्या उभयसत्तेचीं आहेत फ्रान्स देश राजसत्ताक होता. पण नुकत्याच झालेल्या लढाईनें तो प्रजासत्ताक झाला. आपणावर इंग्लिश सरकार राज्यकरितें त्यांचे इंग्लंडांतील राज्य हल्लीं मिश्रसत्ताक आहे. व त्यांनीं एतद्देशीय राजापासून आपला हिंदुस्थान देश हरण केला आहे आणि येथें राजसत्तात्मक राज्य स्थापन केलें आहे. तरी यांचे राज्याचा ओघ मिश्रसत्ताक असल्यामुळें तसें वळण इकडेही थोडें थोडें दृष्टीस पडतें.

[ पुढें चालू. ]

हें पत्र अकोलें येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.